# विद्यार्थ्यांना मार्गदर्शन जीवनविद्येचे

लेखक :
**सद्‌गुरू श्री. वामनराव पै**

किंमत : पंधरा रुपये

प्रकाशक :
**जीवनविद्या मिशन**
(नों. क्र. : ई – ७७३३ मुंबई)
ए-२, सिद्धार्थ नगर, बिल्डींग नं. ५, धीरज उपवनच्या समोर,
वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, बोरीवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६.

© All Rights Reserved by
Jivanvidya Mission
No Part of this publication including Photographs, illustrations, patterns and designs be reproduced, stored in retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopy, recording or otherwise without prior written permission of the owners.

पहिली आवृत्ती : २००१
११ वी आवृत्ती : मे २००३
मे २००३ पर्यंत : २,४६,००० प्रती

## पुस्तके मिळण्याची ठिकाणे

*प्रशासकीय कार्यालय :*
**जीवनविद्या मिशन,**
अे-२, सिद्धार्थ नगर, बिल्डींग नं. ५,
धीरज उपवनच्या समोर,
वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
बोरीवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६.
दूरध्वनी : २८८७ ९०१५
फॅक्स : ०९१-०२२-२८८७ ९०१६

*नोंदणीकृत कार्यालय :*
**जीवनविद्या मिशन,**
हनुमान मंदिर,
२८-ए, दत्ताराम लाड मार्ग,
काळाचौकी,
मुंबई-४०० ०३३.
दूरध्वनी : २४७० ८७८२

Visit us at : www.jeevanvidya.org.
E-mail : wamanrao@jeevanvidya.org

**श्री. आशादीप ल. ढगे**
जे. रॉस ॲन्ड कंपनी, ४४२, सरदार व्ही. पी. रोड, मुंबई - ४०० ००४.
दूरध्वनी : २३८१ १२६९, २३८७ ४१२७
फॅक्स : ०९१-०२२-२३६३ ७५६३
E-mail : jross_co@hotmail.com

**पुणे शाखा :**
११६०, शिवाजी नगर,
द्वारकापूरी, हर्डीकर हॉस्पीटल जवळ,
पुणे - ४४१ ००५
दूरध्वनी : ९५२०-५३८ ४६७४

**श्री. शैलेश म. जोशी (वडेवाले)**
१२८१, शिवाजी नगर,
बालगंधर्व चौक, अमय अपार्टमेंट,
पुणे - ४४१ ००५
दूरध्वनी : ४४५ २५२६/५५३ ३४०५

**आणि नाम संप्रदाय मंडळाच्या इतर सर्व शाखा**

# प्रस्तावना

''विद्यार्थ्यांना मार्गदर्शन जीवनविद्येचे'' हे छोटे पुस्तक वाचकांना सादर करताना आम्हाला फार आनंद होत आहे. सद्‌गुरू वामनराव पै यांनी हे प्रस्तुत पुस्तक खास विद्यार्थ्यांसाठी लिहीलेले आहे. पुस्तक लिहीण्याच्या मागे त्यांचा एक प्रमुख उद्देश आहे. आजचे विद्यार्थी हे राष्ट्राचे उद्याचे नागरिक असून त्यांच्यावरच आपल्या राष्ट्राचे भवितव्य पूर्णत: अवलंबून आहे. सूक्ष्म निरिक्षण केले असता असे दिसून येते की, आजचे विद्यार्थी खूपच हुशार आहेत. अशा हुशार विद्यार्थ्यांना वेळीच जर योग्य मार्गदर्शन मिळाले नाही तर ते वाया जातील व परिणामी राष्ट्राचे हितच धोक्यात येईल. सद्‌गुरू श्री. वामनराव पै हे सेवानिवृत्त उप सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई, असून गेली ५० वर्षे ते सातत्याने लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, निराशावाद व दैववाद नष्ट करून त्यांना सुख, शांती, सुयश व समृद्धी प्राप्त व्हावी म्हणून समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत. ''हे जग सुखी व्हावे व आपले राष्ट्र सर्वांथाने इतर सर्व राष्ट्रांच्या पुढे प्रगतीपथावर जावे'', हा सद्‌गुरुंचा संकल्प असून त्यांचे संपूर्ण तत्वज्ञान 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या दिव्य सिद्धांताभोवती फिरते. सद्‌गुरुंचा वरील संकल्प सिद्धीस जाण्यासाठी आजच्या शाळा–कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना वर म्हटल्याप्रमाणे वेळीच मार्गदर्शन मिळावे व ते राष्ट्राचे उत्तम नागरिक बनून त्यांनी आपल्या राष्ट्राला सर्वांथाने प्रगतीपथावर न्यावे यासाठी प्रस्तुत पुस्तक आम्ही प्रकाशित करीत आहोत.

विद्यार्थ्यांनी सद्‌गुरुंना निरनिराळ्या प्रसंगी विचारलेले विविध प्रश्न लक्षात घेऊन प्रस्तुत प्रश्नोत्तराचे पुस्तक लिहीलेले आहे. विद्यार्थ्यांनी हे

पुस्तक अभ्यासपूर्वक पुन्हा पुन्हा वाचावे, त्यातील बोध आत्मसात करावा व स्वत:चे, समाजाचे व राष्ट्राचे कल्याण साधावे, हीच सद्गुरुंची अपेक्षा आहे. पालकांनी व शिक्षकांनी सुद्धा पुस्तक वाचून विद्यार्थ्यांच्या मनात सद्गुरुंची शिकवण बिंबविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. हे पुस्तक प्रकाशित करण्यामागे अन्य दुसरा कुठलाही उद्देश नाही. स्वत: सद्गुरू हे कार्य निरपेक्षतेने व अव्याहतपणे करीत आहेत. ते प्रवचन–प्रबोधन करतात पण बिदागी घेत नाहीत, ग्रंथ लेखन करतात पण रॉयल्टी घेत नाहीत व अनुग्रह देतात पण गुरुदक्षिणा घेत नाहीत. त्याचप्रमाणे जीवनविद्या मिशनमध्ये कार्य करणारे सद्गुरूंचे नामधारक समाजसेवेचे कार्य कमिशनची अपेक्षा न करता केवळ मिशन म्हणूनच करतात. सद्गुरू वामनराव पै यांच्या आम्ही आतापर्यंत प्रकाशित केलेल्या सर्व पुस्तकांचे वाचकांनी सहर्ष स्वागत केले. म्हणूनच त्या सर्व पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या आम्हाला काढाव्या लागल्या. प्रस्तुत छोटे पुस्तक हे सुद्धा लोकांना आवडेल अशी आमची नम्र अपेक्षा आहे. हल्लीचा भयंकर महागाईचा काळ असून सुद्धा पुस्तकाची किंमत अत्यंत अल्प ठेवलेली आहे.

**जीवनविद्या मिशन,**
**मुंबई.**

# विद्यार्थ्यांना मार्गदर्शन जीवनविद्येचे

प्र. १ शिक्षण म्हणजे काय ? कृपया मार्गदर्शन करावे.

उत्तर मानवी जीवनात ज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे. ज्ञानाइतके पवित्र, मंगल व उपयुक्त अन्य कांहीही नाही. हे ज्ञान संपादन करण्यासाठी आपण जे प्रयत्न करतो त्याला शिक्षण असे म्हणतात. आईच्या कुशीतून शिक्षणाला जी सुरुवात होते ती थेट सरणावर संपेपर्यंत, याचाच अर्थ असा की, जन्मापासून मरेपर्यंत शिकत राहिले पाहिजे. म्हणूनच जीवनविद्या सांगते – 'शिक–क्षण', ''क्षणाक्षणाला शिकणे म्हणजे शिक्षण'' ज्ञान नसेल किंवा शिक्षण नसेल तर माणूस म्हणजे दोन पायांचा पशू होय. माणसातील दोन पायांच्या पशुंची संख्या दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणावर वाढत आहे. पैसा हाच परमेश्वर झाल्यामुळे माणसे या पैशाच्या पाठीमागे पिसाटासारखी धावत आहेत व ज्या ज्ञानातून शहाणपण निर्माण होते त्या ज्ञानाकडे पाठ फिरवून आहेत. जगामध्ये सुख कणभर आहे तर दु:ख मणभर, याचे प्रमुख कारण लोकांनी पैशाला वाजवीपेक्षा जास्त महत्व देऊन ज्ञानाकडे पाठ फिरविली हे होय. थोडक्यात, जीवनात ज्ञानाला पर्याय नाही आणि म्हणूनच जीवनविद्या सांगते –

ज्ञान हे शस्त्र, अस्त्र व शास्त्र आहे
ज्ञान हे शक्ति, बल व सामर्थ्य आहे
ज्ञान हे धन, संपत्ती व ऐश्वर्य आहे
ज्ञान हा देव, ईश्वर व परमेश्वर आहे

म्हणून ज्ञानी व्हा व धन्य व्हा.

प्र. २ तीन तासांच्या लेखी परीक्षेत आमच्या ज्ञानाचे मूल्यमापन योग्य तऱ्हेने होते, असे वाटते का?

उत्तर तीन तासांच्या लेखी परीक्षेत विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन होते असे म्हणता येईल किंवा होत नाही असेही म्हणता येईल. 'शितावरून भाताची परिक्षा' अशी मराठीत एक सुंदर म्हण आहे, त्यालाच अनुसरून असे म्हणता येईल की, तीन तासांच्या लेखी परीक्षेतून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन होऊ शकते. परंतु प्रत्येक विषयाचे ज्ञान इतके प्रचंड आहे की वेळेच्या अभावी अधिक प्रमाणात प्रश्न विचारून सर्वार्थाने मूल्यमापन करता येणे शक्य नाही.

प्र. ३ अभ्यास कसा करावा?

उत्तर बहुतेक विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा हेच समजत नाही. नुसते पुस्तकाचे वाचन केले म्हणजे अभ्यास केला, अशी अनेक विद्यार्थ्यांची गैरसमजूत असते. अभ्यास करण्याच्या कांही विशिष्ट पद्धती असतात. या सर्व पद्धती थोडक्यात खालील प्रमाणे सांगता येतील –

१) जीवनविद्येने सांगितलेला थ्री आर फॉर्म्युला (३ R Formula) म्हणजे (Read, Remember and Reproduce) याचाच अर्थ असा की, १) पुन्हा पुन्हा वाचा, २) वाचलेले स्मरणात ठेवा व ३) स्मरणात ठेवलेले कागदावर लिहून काढा. यालाच अभ्यास करणे असे म्हणतात.

२) पुस्तकाचे वाचन करीत असताना पॅरिग्राफ किंवा परिच्छेद

असतात. दोन–चारदा वाचल्यानंतर प्रत्येक परिच्छेदाचा सारांश काढायचा. दहा–बारा ओळींचा परिच्छेद असेल तर तीन–चार ओळींत सारांश काढायचा. अशा प्रकारे अभ्यास केल्याने वार्षिक परीक्षेच्या वेळेला उजळणी (Revision) करताना हा सारांश अत्यंत उपयुक्त ठरेल.

३) शाळेमध्ये शिक्षक जो धडा किंवा पाठ शिकविणार असतील तो धडा किंवा पाठ घरी प्रथम वाचून शाळेत जाणे. शिक्षक, शाळेत तो धडा किंवा पाठ शिकविताना नीट लक्ष देऊन ऐकणे व शाळेतून घरी परत आल्यावर शिक्षकांनी शिकविलेला तो धडा किंवा पाठ पुन: वाचणे. या पद्धतीने अभ्यासाची तीनदा उजळणी होईल. अशा पद्धतीने अभ्यास करण्याच्या दृष्टीने शिक्षक व विद्यार्थ्यांची एक जबाबदारी आहे. आपण उद्या काय शिकविणार ते शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले पाहिजे व विद्यार्थ्यांनी सुद्धा तसे करण्यास शिक्षकांना आवर्जून विनंती केली पाहिजे.

४) 'शिकविता शिकविता शिकणे', हा अभ्यास करण्याचा उत्तम मार्ग. आपल्या वर्गामधील गरजू विद्यार्थ्यांना जर शिकविण्याचा प्रयत्न केला तर त्याचा दुहेरी फायदा होतो. एका बाजूने आपला अभ्यास चांगला होतो व दुसऱ्या बाजूने आपल्याच वर्गातील विद्यार्थ्याला ज्ञानदान केल्याचे श्रेय मिळते. दुसऱ्यांना शिकविताना आपला अभ्यास चांगला होतो. याचे मुख्य कारण असे की, आपल्याला तो विषय चांगला समजल्याशिवाय आपण तो विषय दुसऱ्यांना शिकवूच

शकत नाही.

५) अभ्यास करण्याची पांचवी पद्धत जरा आगळी आणि वेगळी अशी आहे. या पद्धतीप्रमाणे दोन किंवा दोनापेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रथम घरी अभ्यास करून मग कोणाच्या तरी घरी त्या सर्वांनी एकत्र यावयाचे व एकमेकांना प्रश्न विचारून चर्चा करीत–करीत एकमेकांची परीक्षा पहायची. या पद्धतीने अभ्यास केल्यास विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळविता येईल. थोडक्यात, अभ्यास करणे याचाच अर्थ असा की, एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करणे हे होय. यालाच इंग्रजीमध्ये रिव्हीजन (Revision) असे म्हणतात. म्हणूनच जीवनविद्या सांगते–

'There is no vision without revision'.

विद्यार्थ्यांनी हा सिद्धांत लक्षात ठेवून रिव्हीजन करण्याकडे दुर्लक्ष करू नये.

प्र. ४ अभ्यास करताना मन प्रसन्न कसे ठेवावे?

उत्तर अभ्यास करताना प्रत्येक विद्यार्थ्याने एक महत्वाचा मुद्दा लक्षात ठेवला पाहिजे तो हा की, आपण अभ्यास करतो ते आई–बापावर किंवा शिक्षकावर उपकार करण्यासाठी नव्हे. 'अभ्यास करणे' हे विद्यार्थ्यांचे सर्वप्रथम कर्तव्य होय. या कर्तव्य धर्माचे पालन जो विद्यार्थी करत नाही तो विद्यार्थी देवाच्या दरबारात गुन्हेगार ठरतो. वास्तविक, अभ्यास करण्यामध्ये कांहीच कष्ट नसतात. आरामात पंख्याखाली बसून जर विद्यार्थी एकाग्रचित्ताने अभ्यास करू शकत नसेल तर भवितव्यात तो कांहीच करू शकणार नाही. शिवाय अभ्यास करण्याच्या वयात जर अभ्यास

केला तर अभ्यासाचे विशेष कष्ट होत नाहीत. विद्यार्थ्यांनी एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की 'अभ्यास करणे' हा प्रकार त्याला चुकविता येत नाही. अभ्यास करण्याच्या वयात अभ्यास करून उत्तम यश संपादन केले नाही तर भविष्यात प्रौढ वयात त्याला कुठल्याना कुठल्या तरी परिक्षेला बसावे लागेल व त्यासाठी अभ्यास करावाच लागेल. प्रौढ वयात अभ्यास करण्याचे कष्ट मोठ्या प्रमाणात जाणवतात. म्हणून विद्यार्थ्यांनी कसून अभ्यास करावा. दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, अभ्यासाची गोडी लागली पाहिजे. त्यासाठी अभ्यासाचे स्वरुप काय हे विद्यार्थ्यांने समजावून घेतले पाहिजे. अभ्यासासाठी अभ्यास करायचा नसतो किंवा खूप गुण मिळविण्यासाठी सुद्धा अभ्यास करायचा नसतो. जी क्रमिक पुस्तके अभ्यासासाठी असतात, त्या पुस्तकात उत्कृष्ट ज्ञान भरलेले असते. ते ज्ञान संपादन करण्यासाठीच अभ्यास करायचा असतो. ज्ञानाचे महत्व लक्षात घेऊन व ज्ञान संपादन करण्याच्या हेतूने अभ्यास केला तर विद्यार्थ्याला अभ्यास करण्यात निश्चित गोडी लागेल. अभ्यास करून ज्ञान मिळविल्याने भविष्यात उत्कर्षाचे अनेक दरवाजे खुले होणार आहेत, हे प्रत्येक विद्यार्थ्याने लक्षात ठेवले पाहिजे. आपण अभ्यास करतो ते आपल्या भल्यासाठी व आपल्या उत्कर्षासाठी, हे नित्य स्मरणात ठेवल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासाची सहज गोडी लागेल. अभ्यास करताना मन प्रसन्न राहण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

प्र. ५ अभ्यास किती वेळ करावा ? कृपया मार्गदर्शन करावे.

उत्तर अभ्यास किती वेळ करावा हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या कुवतीवर

अवलंबून आहे. तल्लख बुद्धीच्या हुशार विद्यार्थ्याने एक तास सुद्धा अभ्यास केला तरी चालेल. याच्या उलट बुद्धीने मंद व कमी हुशार विद्यार्थ्याने कितीतरी अधिक तास अभ्यास करणे आवश्यक आहे. या संदर्भात एक गोष्ट मला आठवते ती मी सांगतो. एक राजा होता. त्याला नवीन–नवीन कविता वाचण्याचा व ऐकण्याचा छंद होता. त्यासाठी राजाने एक युक्ती केली, त्याने राज्यात दवंडी पिटविली की 'माझ्या दरबारात जो कोणी नवीन कविता वाचून दाखवेल त्याला मोठे पारितोषिक दिले जाईल'. त्याप्रमाणे दरबारात नवीन कविता वाचून दाखविण्यासाठी कवी येऊ लागले. राजाने आपल्या बाजूला दहा पंडित ओळीने बसविले होते. पहिला पंडित एक पाठी होता, दुसरा दो पाठी होता. अशा क्रमांकाने शेवटचा दशपाठी होता. कवीने नवीन कविता वाचून दाखविली की राजा लगेच म्हणायचा, 'अरे, ही तर कविता आम्हा सर्वांनाच माहित आहे'. मग तो लगेच पहिल्या एकपाठी पंडिताला ती कविता म्हणून दाखवायला सांगे, पंडित एकपाठी असल्यामुळे तात्काळ ती कविता म्हणून दाखवित असे. त्यानंतर राजा म्हणायचा, 'अहो, ही कविता आमच्या दुसऱ्या पंडितालाही ठाऊक आहे.' असे म्हणून तो राजा त्या दोपाठी पंडिताला कविता म्हणून दाखविण्यास सांगे. अशा तऱ्हेने दहा पंडित ती नवीन कविता म्हणून दाखवित. हा सर्व प्रकार बघून ते सर्व कवी आश्चर्य करीत निघून जात. या गोष्टीचा भावार्थ असा की, कांही माणसे एकपाठी तर कांही दोपाठी, तीनपाठी .... दहा पाठी असतात. याचा अर्थ असा की, पहिल्याला एकदा वाचून किंवा ऐकून लक्षात राही तर

इतर माणसांना अधिक वेळा वाचावे किंवा ऐकावे लागे. ही गोष्ट प्रत्येक विद्यार्थ्याला लागू आहे. आपण किती वेळ अभ्यास करायचा हे प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या कुवतीप्रमाणे ठरवायचे असते. आपण किती जेवायचे हे आपणच आपली पचनशक्ती पाहून ठरवायचे असते, इतरांचे ते काम नव्हे. त्याचप्रमाणे अभ्यासाचे आहे.

प्र. ६ विद्यार्थ्यांमध्ये 'हुशार' व 'ढ' विद्यार्थी असा प्रकार असतो का ?

उत्तर जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून 'हुशार' विद्यार्थी व 'ढ' विद्यार्थी असा प्रकार मुळातच असू शकतो, असे म्हणता येणार नाही. जन्माला आल्यापासून मुलांवर विविध प्रकारचे शिक्षण, शिकवण व संस्कार कळत–नकळत दिले जातात. आई–बाप, बंधू–भगिनी, आजी–आजोबा, काका–काकी, शिक्षक–प्राध्यापक, मामा–मामी, इतर नातेवाईक, अवती भवतीचे शेजारी आणि मित्र–मैत्रिणी या सर्वांकडून मुलांवर, वर म्हटल्याप्रमाणे शिक्षण, शिकवण व संस्कार दिले जातात. विद्यार्थ्यांच्या मनाची व बुद्धीची इष्ट किंवा अनिष्ट जडणघडण या सर्व इष्ट किंवा अनिष्ट शिक्षण, शिकवण व संस्कार यातून होत असते. असे जरी असले तरी योग्य मार्गदर्शनाखाली योग्य पद्धतीने प्रयत्न केल्यास तथाकथित 'ढ' विद्यार्थी सुद्धा हुशार विद्यार्थी होऊ शकतो, असा जीवनविद्येचा सिद्धांत आहे आणि म्हणूनच जीवनविद्या सांगते–

'वस्तुस्थितीचा स्वीकार करून तिला सुरेख आकार देण्याच्या प्रयत्नात यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे.'

प्र. ७ आम्ही अभ्यासा व्यतिरिक्त खेळात लक्ष घालणे आवश्यक

आहे का ?

उत्तर 'अती तेथे माती' अशी मराठीमध्ये एक सुंदर म्हण आहे. झोपणे आवश्यक आहे असे जरी असले तरी झोपायचे किती वेळ याला मर्यादा असतेच. खाणे आवश्यक आहे, परंतु खायचे किती याला मर्यादा असलीच पाहिजे. त्याचप्रमाणे अभ्यास करणे आवश्यक आहे हे जरी खरे असले तरी अभ्यासात किडा होऊन राहणे सर्वथैव अयोग्य आहे. अभ्यास, खेळ आणि विश्रांती या तिन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. म्हणून पुरेसा अभ्यास केल्यानंतर थोडा वेळ खेळलेच पाहिजे व त्यानंतर थोडी विश्रांती घेणे योग्य ठरेल.

प्र. ८ ऐपत नसताना विद्यार्थ्यांनी खाजगी शिकवणीस गेले पाहिजे का ?

उत्तर आई–बाप अशिक्षित असतील तर किंवा आई–बाप सुशिक्षित असून सुद्धा कांही कारणामुळे मुलांना शिकवणे शक्य नसेल तर किंवा शाळेमध्ये शिक्षक चांगल्या रितीने व योग्य पद्धतीने शिकवित नसतील तर खाजगी शिकवणीसाठी जाणे, हाच मुख्य पर्याय ठरतो. याला दुसरा पर्याय म्हणजे विद्यार्थ्यांनी जिद्दीने मन लावून अभ्यास करणे व आवश्यक त्या समयी हुशार विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन घेणे.

प्र. ९ कांही आई–बाप वर्गात पहिलाच नंबर आला पाहिजे असा आग्रह धरतात ते बरोबर आहे का ?

उत्तर आपल्या मुलांनी वर्गात पहिला नंबर काढावा अशी जवळ जवळ सर्वच पालकांची मनापासून इच्छा असते व अशी इच्छा करण्यात गैर असे कांही नाही. परंतु प्रत्यक्षात हे शक्य

नाही याची पालकांनी नोंद घेतली पाहिजे. पहिला नंबर जर एकच आहे तर सर्व विद्यार्थ्यांना तो कसा मिळू शकेल याचा आई-बापांनी विचार करावा. जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांनी गुण मिळवून पहिला नंबर काढण्यापेक्षा ज्ञान मिळविण्यासाठी अभ्यास करणे योग्य ठरेल. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे मार्क्स ओरीयन्टेड (Marks Oriented) अभ्यास करण्यापेक्षा नॉलेज ओरीयन्टेड (Knowledge Oriented) अभ्यास करणे विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टितून अत्यंत उपयुक्त ठरेल. Knowledge Oriented म्हणजेच ज्ञान संपादन करण्याच्या हेतुने विद्यार्थ्यांनी अभ्यास केला तर विद्यार्थ्याला ज्ञान तर मिळेलच शिवाय त्याला परीक्षेत उत्तम गुण सुद्धा मिळविता येतील. ज्ञान संपादन करण्यासाठीच जो विद्यार्थी अभ्यास करतो त्याला परीक्षेची मुळीच भिती वाटत नाही. उलट कुठलाही प्रश्न विचारला तर ज्ञानाच्या बळावर तो सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास सदैव सिद्ध असतो. म्हणूनच जीवनविद्या सांगते -

'ज्ञान हाच देव, अज्ञान हा सैतान आहे'.

दुसरा मुद्दा असा की, जन्म देण्यापासून ते आपल्या पायावर उभे करण्यापर्यंत आपले माता-पिता आपली सर्व प्रकारे सेवा करीत असतात. या सेवेच्या मोबदल्यात आपले माता-पिता आपल्याकडून कसलीही अपेक्षा करीत नाहीत. असे जरी असले तरी माता-पिता आपली जी सेवा करतात त्याच्या मोबदल्यात आपण त्याना 'मेवा' देऊन संतुष्ट करणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. आपल्या मुलांनी शाळा-कॉलेजमध्ये

जाऊन चांगला अभ्यास करून व चांगले गुण मिळवून उत्तम यश संपादन करावे, अशी सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांची मनापासून इच्छा असते. मनोभावे अभ्यास करून विद्यार्थी जेव्हां यश मिळवितात तेव्हां त्यांच्या माता–पित्यांना जो आनंद होतो, तो वर्णन करणे कठीण आहे. ईश्वर स्वरुप माता–पित्यांना असा आनंद देऊन जे विद्यार्थी त्यांचा आशिर्वाद मिळवितात ते आशिर्वाद विद्यार्थ्यांना भविष्यात सुख, शांती, समाधान, यश व समृद्धी प्राप्त करून देण्यास सर्व प्रकारे सहाय्यभूत ठरतात, हे विद्यार्थ्यांनी सदैव ध्यानात ठेवावे.

प्र. १० विद्यार्थ्यांनी मनोरंजनासाठी टी.व्ही., सिनेमा, नाटक बघावे का ?

उत्तर या प्रश्नाचे उत्तर मी वर दिलेले आहेच. अभ्यास, खेळ व विश्रांती या तिन्ही गोष्टी विद्यार्थ्यांना आवश्यक आहेत. पुरेसा अभ्यास केल्यानंतर मनोरंजानासाठी विद्यार्थ्यांनी थोडा वेळ टी.व्ही. बघण्यास कांहीच हरकत नाही. क्वचित नाटक, सिनेमाला जायला सुद्धा हरकत नाही. परंतु कुठल्याही परिस्थितीत टी.व्ही. समोर म्हणजेच इडियट बॉक्स (Idiot Box) समोर ठोकळ्यासारखे तासन्तास बसणे म्हणजे अनेक संकटांना आमंत्रण देणे होय. टी.व्ही. समोर सतत बसण्याने आज ना उद्या मुळव्याधीचा त्रास होणारच. सतत टी.व्ही. बघितल्याने डोळे बिघडणारच, परिणामी डॉक्टरकडे जाणे आलेच. टी.व्ही. समोर सतत बसून ऐकत राहिल्याने कान बिघडणार हे ओघानेच आले. सतत टी.व्ही. पाहिल्याने आज ना उद्या शरीर प्रकृती ढासळणार, परिणामी अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष होऊन अपयशाला

सामोरे जावे लागणार हे सांगण्यासाठी ज्योतिष्याची गरज नाही.

प्र. ११ विद्यार्थ्यांनी शाळा, कॉलेजच्या Extra Curricular Activities मध्ये भाग घ्यावा का? (उदा. स्पर्धा, नाटक, खेळ, एन्.सी.सी.)

उत्तर विद्यार्थी शाळेमध्ये किंवा कॉलेजमध्ये जातात ते प्रामुख्याने शिकण्यासाठी, हा मुद्दा विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम लक्षात ठेवला पाहिजे. म्हणून पुरेसा अभ्यास करून Extra Curricular Activities मध्ये भाग घेणे या दोन्ही गोष्टी करणे विद्यार्थ्यांना आवश्यक तितका स्टॅमिना नसल्यामुळे शक्य होईल असे वाटत नाही. म्हणून जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून ज्या विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या माध्यमातून करीअर (Career) करण्याची इच्छा असेल त्यांनी Extra Curricular Activities च्या भानगडीत न पडलेले बरे.

प्र. १२ शाळा, कॉलेजच्या सहलीत विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा का?

उत्तर शाळा, कॉलेजमधून ज्या सहली काढल्या जातात त्यात विद्यार्थ्यांनी भाग घेणे योग्य ठरेल की नाही हे सर्वस्वी त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबून असेल. सहलीत भाग घेणारे विद्यार्थी व सहलीला नेणारे शिक्षक किंवा प्राध्यापक यांच्या गुणदोषावर सहलीत भाग घेणे किंवा न घेणे ठरवावे लागेल. सर्वसाधारणपणे अनुभव असा आहे की, चांगल्या-चांगल्या मुलांना घाणेरडी व्यसने व वाईट सवयी, अशा प्रकारच्या सहलीतच जडल्या जातात. अनिष्ट गोष्टीकडे सहज वळण्याचा मनाचा स्वभाव आहे. ज्याप्रमाणे पाणी सखल दिशेने सहज वाहते, त्याप्रमाणे अनिष्ट गोष्टीकडे मन सहज वळत असते. अशा परिस्थितीत

सहलीला गेलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कांही अनिष्ट प्रवृत्तीची व कांही अनिष्ट व्यसनांच्या आहारी गेलेली मुले, शिक्षक व प्राध्यापक असतील तर ही माणसे चांगल्या मुलांवर विशिष्ट प्रकाराने दबाव आणून त्यांना व्यसनाधीन होण्यास प्रवृत्त करतील. 'भीड भिकेची बहीण' अशी मराठीत एक उत्कृष्ट म्हण आहे. भीडेला बळी पडून चांगली मुले वाया जातात, अशी शेकडो उदाहरणे दाखविता येतील. त्याचप्रमाणे केवळ गंमत म्हणून कांही चांगली मुले अनिष्ट व्यसनांची चव चाखतात आणि नंतर तीच मुले व्यसनाधीन होऊन वाया जातात. त्याचप्रमाणे जर सहलीला गेलेल्या शिक्षकांपैकी कांही शिक्षक सिगारेट ओढणारे, दारू पिणारे, तंबाखू किंवा गुटखा खाणारे असतील तर चांगल्या मुलांना सुद्धा ती व्यसने जडण्यास वेळ लागणार नाही. दुसरा मुद्दा असा की, सहलीला नेणाऱ्या शिक्षकांचे उत्कृष्ट नियोजन नसेल व त्यांचे विद्यार्थ्यांवर नियंत्रण नसेल तर सर्व कारभारच बेशिस्त होऊन मुलांना धोका पोहचण्याचा संभव असतो. सहलीला गेलेल्या विद्यार्थ्यांना भयंकर अपघात होणे, पोहायला गेलेली मुले बुडून मरणे, पाय घसरून दरीत कोसळणे, वगैरे अनिष्ट प्रकार घडलेल्यांची अनेक उदाहरणे वर्तमानपत्रात वाचायला मिळतात आणि मित्र–मंडळींकडून व नातेवाईकांकडून ऐकायला मिळतात. म्हणूनच अशा सहलीला विद्यार्थ्यांनी जाणे किंवा न जाणे हे त्या परिस्थितीवर अवलंबून असेल. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी योग्य तो निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना सहलीला नेण्याची प्रचंड जबाबदारी लक्षात घेऊन स्वत:

प्रिन्सिपॉलने नियोजनात लक्ष घालून सुयोग्य शिक्षकांची सहलीसाठी नियुक्ती करावी.

प्र. १३ शिक्षण घेऊन सुद्धा नोकऱ्या मिळत नाहीत मग शिक्षण घेण्याची आवश्यकता काय ?

उत्तर 'नोकऱ्या मिळविण्यासाठी शिक्षण घ्यायचे' ही संकल्पनाच मुळात चुकीची आहे. नोकऱ्या कमी व त्या मिळविण्यासाठी प्रयत्न करणारी मुले असंख्य, अशी परिस्थिती असल्यावर सर्वांना नोकऱ्या मिळणारच कशा ? त्यात लोकसंख्येची दिवसेंदिवस भर पडत गेल्यामुळे हा प्रश्न अधिकच उग्र होत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यामुळे सुद्धा काम करण्यासाठी माणसांची गरज घटत चाललेली आहे. अशा परिस्थितीत नोकऱ्या मिळण्यासाठी शिक्षण घेणे ही कल्पनाच मुळात चुकीची ठरते. जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून शिक्षण घ्यावयाचे ते मनाच्या व बुद्धीच्या कक्षा रुंदावण्यासाठी. त्यासाठी वाचन, श्रवण, चिंतन, अभ्यास व मार्गदर्शन यांची आवश्यकता असते. शिक्षण संपल्यावर पोट भरण्यासाठी नोकरी मिळण्यावर लक्ष न ठेवता कांहीतरी स्वतंत्र व्यवसाय करणे उचित ठरेल. अशिक्षित लोक सुद्धा भांडवल नसताना धंदा करून खूप पैसे मिळवितात. अशी अनेक उदाहरणे आमच्या पाहण्यात आहेत. मग सुशिक्षितांना स्वतंत्र व्यवसाय करून पैसे मिळविण्यास का अडचण पडावी ? स्वत:ला व इतरांना उपयोगी पडणारा उद्योग हा सर्वात श्रेष्ठ योग आहे, हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शिक्षण संपल्यावर पुढे काय करायचे याची योग्य ती योजना आधीच

करून ठेवली पाहिजे. जीवनामध्ये व्यवसाय करण्यासाठी अनेक क्षेत्रे उपलब्ध असतात. परंतु सामान्यपणे सामान्य लोक त्या विविध क्षेत्रांचा विचार सुद्धा न करता नोकरीच्या ठराविक चाकोरीतून जाण्याचा प्रयत्न करतात. ही परिस्थिती विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना धोकादायक तर आहेच शिवाय राष्ट्राचा उत्कर्ष व उन्नती साधण्यासाठी सुद्धा अनिष्ट आहे. दुसरा अत्यंत महत्वाचा मुद्दा असा की, विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी एक गोष्ट नित्य स्मरणात ठेवली पाहिजे ती ही की, पोट भरण्यासाठी विद्यार्थ्यांना शिकवायचे नसते किंवा विद्यार्थ्यांनी भविष्यात पोट भरण्यासाठी एक साधन म्हणून शिकायचे नसते. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट ज्ञानदान करून त्यांनी ''राष्ट्राचे उत्तम नागरिक बनणे'' हाच शिकविण्याचा व शिकण्याचा मुख्य उद्देश असला पाहिजे. थोडक्यात, आपले राष्ट्र श्रीमंत, बलवान व सामर्थ्यसंपन्न होऊन जगाला सुखी करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून घेण्यासाठीच शाळा–कॉलेजमध्ये जाऊन विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी ज्ञान संपादन केले पाहिजे. विज्ञान व प्रज्ञान हे दोन्ही ज्ञानाचेच प्रकार आहेत. विज्ञान म्हणजे विश्वाचे ज्ञान व प्रज्ञान म्हणजे प्रभूचे ज्ञान. विज्ञानाच्या बळावर आधिभौतिक प्रगती साधता येते तर प्रज्ञानाच्या बळावर मानसिक–अध्यात्मिक उन्नती साधता येते. राष्ट्राची प्रगती साधण्यासाठी राष्ट्राला उत्कर्ष व उन्नती दोन्ही साधता आली पाहिजे व त्यासाठी विज्ञान व प्रज्ञान दोन्ही राष्ट्रीय जीवनाला आवश्यक आहे. थोडक्यात, जीवनात शिक्षणाचे सामर्थ्य अपरंपार आहे. पशूचा पशुपती करण्याचे विलक्षण सामर्थ्य शिक्षणात आहे. म्हणून शिक्षण असे दिले गेले पाहिजे

की त्यातून एका बाजूने माणसाला पोट भरता आले पाहिजे व दुसऱ्या बाजूने त्या शिक्षणातून त्याला शहाणपण प्राप्त झाले पाहिजे.

प्र. १४ देव विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करतो का ?

उत्तर विद्यार्थी समजतात त्याप्रमाणे देव त्यांना अभ्यासात मदत करत नाही. देवाने म्हणा किंवा निसर्गाने म्हणा प्रत्येक विद्यार्थ्याला बुद्धीचे वरदान बहाल केलेले आहे. या बुद्धीचा वापर विद्यार्थी जितका अधिक करतील तितक्या प्रमाणात बुद्धी तीक्ष्ण व तेजस्वी होऊ लागते. सुरीचा वापर केला नाही तर तिला गंज चढतो व ती निरुपयोगी होते, त्याप्रमाणे बुद्धीचा वापर केला नाही तर बुद्धीला गंज चढतो व ती यथावकाश मंद–मंद होऊन पूर्णपणे निष्प्रभ होते. अभ्यास करणे म्हणजेच बुद्धीचा वापर करणे. त्याचप्रमाणे पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे ह्यालाच अभ्यास असे म्हणतात. म्हणूनच जीवनविद्या सांगते –
''देवासकट सर्व कांही प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य प्रयत्नात आहे म्हणून प्रयत्न हे रत्न देवापेक्षाही श्रेष्ठ होय''.

प्र. १५ परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नवस करणे, गंडेदोरे बांधणे वगैरे प्रकार करणे योग्य आहे का ?

उत्तर नवस करणे म्हणजे प्रत्यक्षात देवाला लाच देणे होय. व्यवहारात माणसे अधिकारी वर्गाला लाच देऊन कामे करून घेतात. नवस करण्यात नेमका तोच प्रकार आहे. 'तू मला परिक्षेत उत्तीर्ण कर म्हणजे मी तुला पांच किलो पेढे देईन' अशा पद्धतीने विद्यार्थी देवाला नवस करीत असतात. हा सर्व प्रकार सर्वथैव ओंगळ व भोंगळ आहे. 'मला नवस करा म्हणजे मी

तुमच्या मनाप्रमाणे सर्व कांही करीन' असे देवाने आतापर्यंत कुणालाही, केव्हांही व कोठेही सांगितलेले नाही. प्रत्यक्षात विद्यार्थीच किंवा त्याचे पालक किंवा पुरोहित वर्ग तशा प्रकारच्या कल्पना स्वत:च निर्माण करतात व या सर्व प्रकारात देवाला मात्र निष्कारण गुंतवतात. त्यांनी कल्पना केल्याप्रमाणे यदाकदाचित विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण झाला व त्याने देवापुढे पांच किलो पेढे ठेवले तर त्यातला अर्धा पेढा सुद्धा किंबहुना त्या पेढ्यातला कण सुद्धा देव खात नाही. सर्व पेढे गिळंकृत करतात ते देवाला नवस करणारे. या संदर्भात विद्यार्थ्यांनी एक महत्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. आपण ज्या मुर्तिला नवस करतो किंवा कौल लावतो ती मुर्ती बसत नाही, उठत नाही, हलत नाही, हसत नाही, चालत नाही, बोलत नाही किंबहुना ती मुर्ती अक्षरश: कांहीही करीत नाही अशा परिस्थितीत ती मुर्ती कृपा करील व नवसाला पावून आपल्याला परीक्षेत पास करील, अशी विद्यार्थ्यांनी अपेक्षा करणे शहाणपणाचे लक्षण ठरेल का ? याचा विद्यार्थ्यांनीच विचार करावा. थोडक्यात, नवस करणे, कौल लावणे, गंडेदोरे बांधणे वगैरे सर्व प्रकार म्हणजे शुद्ध अंधश्रद्धा होय. अशा अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन दैववादी बनण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी स्वत:च्याच हृदयातील ईश्वरी शक्तीवर श्रद्धा ठेवून प्रयत्नवादाची कास धरली पाहिजे. प्रत्येकाच्या हृदयात ईश्वर आहे असे आपल्या सर्व साधु-संतांनी पुन्हां पुन्हां आवर्जुन सांगितले आहे. या संदर्भात अमेरिकन फिलॉसॉफर डॉ. मर्फी यांचे खालील वचन चिंतनीय आहे.

"The knowledge of a mighty power within you which is capable of bringing to pass all your desires gives you immense confidence and sense of peace."

थोडक्यात, अंधश्रद्धेच्या आहारी न जाता विद्यार्थ्यांनी हृदयस्थ ईश्वरावर श्रद्धा ठेवून नित्य प्रयत्नरत रहावे.

प्र. १६ औषधे घेऊन विद्यार्थी आपली बुद्धी तल्लख करू शकतो का?

उत्तर औषधे घेऊन बुद्धी तल्लख होते हा केवळ गैरसमज आहे. औषधे घेऊन बुद्धी तल्लख झाली, असा भास कांही काळ निर्माण होणे शक्य आहे. औषधे तर सोडाच पण विडी किंवा सिगारेट ओढण्याने किंवा दारू पिण्याने बुद्धीला तेज चढते किंवा विचारशक्ती प्रदिप्त होते, असा सुद्धा गैरसमज कित्येक लोकांमध्ये असतो. परंतु अशा तात्कालिक लाभाच्या आहारी जाणे म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वत:च्याच पायावर स्वत:च धोंडा मारण्यासारखे आहे. बुद्धिचा वापर केल्यानेच बुद्धी तल्लख होते, औषधाने नव्हे.

प्र. १७ माता, पिता व शिक्षक हे देवासमान आहेत असे मानणे वस्तुस्थितीला धरून आहे का?

उत्तर 'देतो तो देव' असा जीवनविद्येचा सिद्धांत आहे. देवाला आपण देव म्हणतो याचे मुख्य कारण देवाने म्हणा किंवा निसर्गाने म्हणा आपल्याला अत्यंत मौल्यवान असे मानवी शरीर दिलेले आहे. इतकेच नव्हे तर पांच कर्मेंद्रिये, पांच ज्ञानेंद्रिये, पांच पंचप्राण, मन, चित्त, बुद्धी अशी अंतरेंद्रिये,

स्मरणशक्ती, इच्छाशक्ती अशा प्रकारच्या सूक्ष्म व अत्यंत उपयुक्त अशा महान देणग्या दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जीवनात आपल्याला आनंदाची रासक्रिडा करण्यासाठी विश्व निर्माण केलेले आहे. थोडक्यात, देवाने आपल्यावर कृपेची बरसात केलेली आहे. म्हणून अशा देवाशी सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे. त्याचप्रमाणे माता आणि पिता आपल्याला खूप कांही देत असतात ते आपल्याला जन्म देतात, अनेक प्रकारच्या हाल अपेष्टा सोसून व खस्ता खाऊन ते आपले लालन पालन, संगोपन, संवर्धन करतात व शिक्षण देऊन आपल्याला आपल्या पायावर उभे करतात. आई–बापाचे आपल्यावर अनंत उपकार असतात, म्हणून त्यांना देव मानणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शिक्षक–प्राध्यापक आपल्याला ज्ञान देतात. जगात ज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे व ज्ञानदानासारखे मोठे पुण्य नाही. म्हणून शिक्षकांना देव मानणे उचित ठरते. या संदर्भात विद्यार्थ्यांनी जीवनविद्येचा खालील सिद्धांत नित्य लक्षात ठेवला पाहिजे.

''कृतज्ञता हे पुण्य व कृतघ्नता हे पाप होय.'' त्याचप्रमाणे डॉ. मर्फी सांगतात –

"A grateful heart is always close to the creative forces of the universe causing countless blessings to flow towards it, by the law of reciprocal relationship based on the cosmic law of action and reaction."

या संदर्भात एका इंग्लीश लेखकाचे वचन अत्यंत चिंतनीय आहे.

"Think of all you have to be grateful for and thank God for all your boons and bounties."

प्र. १८ विद्यार्थ्यांनी महत्वाकांक्षी असावे का? व ती साध्य करण्यासाठी काय करावे?

उत्तर प्रत्येक विद्यार्थ्याने महत्वाकांक्षी असलेच पाहिजे. ज्या विद्यार्थ्याला महत्वाकांक्षा नाही तो विद्यार्थी जीवंत असून मेल्यासारखाच आहे. परंतु 'महत्वाकांक्षा असणे' म्हणजे नेमके काय हे समजावून घेणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थ्यांची 'खूप पैसा मिळविणे' हीच महत्वाकांक्षा असते. जीवनविद्येला ही महत्वाकांक्षा अभिप्रेत नाही. कारण अशी महत्वाकांक्षा बाळगणारे विद्यार्थीच पुढील आयुष्यात वाटेल त्या अनिष्ट मार्गाने पैसे मिळविण्यास प्रवृत्त होतात. राष्ट्राला भ्रष्टाचाराचा कॅन्सर हा महाभयंकर रोग जडलेला आहे, त्याचे कारण गडगंज पैसा मिळविण्याची महत्वाकांक्षा हेच होय. कॅन्सर झालेला माणूस अनेक यातना भोगून शेवटी रोगाला बळी पडतो, त्याचप्रमाणे भ्रष्टाचाराचा कॅन्सर राष्ट्राचा म्हणजे पर्यायाने आपणा सर्वांचाच सर्वनाश करील, हे सांगण्यास ज्योतिष्याची गरज नाही. भ्रष्टाचार करणाऱ्या माणसांची मजल प्रत्यक्षात राष्ट्रद्रोहापर्यंत सुद्धा जाऊ शकते. किंबहुना ही भ्रष्टाचारी माणसे राष्ट्रद्रोही असून राष्ट्राचे एक नंबरचे शत्रू आहेत असेच मानले गेले पाहिजे. म्हणून पैसा मिळविण्याची महत्वाकांक्षा बाळगण्यापेक्षा ज्ञान संपादन करण्याची महत्वाकांक्षा बाळगणे महत्वाचे आहे हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात ज्ञान

संपादन करून राष्ट्राचा उत्कर्ष व उन्नती साधण्यासाठी व त्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी त्या ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. थोडक्यात, विद्यार्थ्यांनी राष्ट्राची सर्वांगीण प्रगती साधण्याचीच महत्वाकांक्षा बाळगून विद्यार्जन केले पाहिजे, अशी जीवनविद्येची शिकवण आहे.

प्र. १९ शालेय व कॉलेज जीवनात विद्यार्थ्यांचे कर्तव्य कोणते ?

उत्तर भारतीय संस्कृतीत कर्तव्य धर्मालाच खरा धर्म असे म्हटलेले आहे. सर्वसाधारणपणे ज्याला आपण धर्म असे म्हणतो, त्याला इंग्लीश मध्ये रिलीजन (Religion) असे म्हणतात. म्हणून कर्तव्यधर्म व धर्म (Religion) या दोन गोष्टी भिन्न आहेत. हिऱ्याला जसे अनेक पैलू असतात, त्याचप्रमाणे कर्तव्यधर्मरुपी हिऱ्याला अनेक पैलू आहेत. मातृधर्म, पितृधर्म, पुत्रधर्म, पतीधर्म, पत्नीधर्म, शेजारधर्म, मित्रधर्म, राष्ट्रधर्म, असे हे सर्व प्रकार कर्तव्य धर्मरुपी हिऱ्याचे विविध पैलू आहेत. ज्याला आपण धर्म (Religion) असे म्हणतो तो प्रत्यक्षात आहे उपासना धर्म व हा उपासना धर्म, कर्तव्य धर्मरुपी हिऱ्याच्या अनेक पैलूंपैकी एक मामुली पैलू आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र मानवी जीवनात कर्तव्यधर्माच्या अनेक पैलूंकडे दुर्लक्ष होऊन जरूरीपेक्षा अधिक महत्व या धर्माला (Religion) म्हणजे कर्मकांडात्मक उपासना धर्माला दिले गेलेले आहे, असे दिसून येते. विद्यार्थ्यांच्या जीवनात त्यांचा प्रमुख कर्तव्य धर्म म्हणजे मनापासून अभ्यास करून ज्ञान संपादन करणे हा होय. या ज्ञानाचे महत्व खऱ्या अर्थाने शब्दात सांगणे कठीण आहे. मानवी जीवनात पैसा जितका आवश्यक आहे त्याच्यापेक्षा सहस्त्रपटीने ज्ञान महत्वाचे

आहे. ज्या राष्ट्रातील लोक अडाणी, अज्ञानी व अंधश्रद्धाधीन असतात ते राष्ट्र कधीही प्रगती पथावर जाऊ शकत नाही. उलट त्या राष्ट्राची अधोगती होऊन ते रसातळाला जाईल हे निश्चित. म्हणून जीवन विद्या आवर्जुन सांगते –

''तुम्ही ज्ञानी व्हा, तुम्ही हुशार व्हा,
तुम्ही बुद्धीवान व्हा सारे''

थोडक्यात, आवडीने अभ्यास करून ज्ञान संपादन करणे, हाच प्रत्येक विद्यार्थ्याचा कर्तव्य धर्म आहे. या कर्तव्य धर्माचे जे विद्यार्थी पालन करणार नाहीत त्यांना भविष्यात पश्चाताप करण्याची पाळी येईल. याच्या उलट जे विद्यार्थी या कर्तव्य धर्माचे प्रामाणिकपणे पालन करतील ते जीवनात यशस्वी ठरतील, ही काळ्या दगडावरची रेष आहे.

प्र. २० शैक्षणिक, सामाजिक व राजकीय संघटनांचा विद्यार्थ्यांना उपयोग होतो का ? व त्यात विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा का ?

उत्तर बहुतेक सर्व संघटना किंवा संस्था विशिष्ट उच्च ध्येयाने प्रेरीत होऊन स्थापन करण्यात आलेल्या असतात. प्रत्यक्षात मात्र किती संस्था या उच्च ध्येयाशी एकनिष्ट राहून कार्य करतात, हा संशोधनाचा विषय होऊ शकेल. परंतु ज्या संस्था विद्यार्थ्यांच्या हितासाठी व कल्याणासाठी कार्य करतात त्यात विद्यार्थ्यांनी अवश्य भाग घ्यावा. परंतु कुठल्याही परिस्थितीत अभ्यासाकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी घेणे आवश्यक आहे.

प्र. २१ विद्यार्थी परीक्षेत नापास झाले तर त्यांनी काय करावे ?

उत्तर मानवी जीवन सुख–दु:खाने भरलेले आहे. अनुकूल घटना

घडतात तेव्हां माणसे सुखी होतात व प्रतिकूल घटना घडल्या तर ते दु:खी होतात. त्याचप्रमाणे जीवनात यश किंवा अपयश प्राप्त होण्याचे अनेक प्रसंग येतात. म्हणून प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली तर माणसाने गोंधळून न जाता बुद्धी स्थिर ठेवून त्या प्रसंगाना सामोरे गेले पाहिजे. मानवी जीवनात सुख–दु:खाचे प्रसंग किंवा घटना सर्वांवरच येत असतात, मग तो पंत असो, महंत असो, संत असो किंवा भगवंत असो. यापैकी नव्वद टक्के घटना माणसाच्या स्वाधीन असतात तर दहा टक्के घटना पराधीन असतात. परंतु सामान्य लोकांचा असा गैरसमज आहे की, मानवी जीवनात सर्वच घटना पराधीन असतात. म्हणून दैववादाचा त्याग करून प्रयत्नवादाची कास धरण्यात खरे शहाणपण आहे. परीक्षेत नापास होणे म्हणजे फार मोठी जगावेगळी गोष्ट घडली असे नाही किंवा डोक्यावर आभाळ कोसळले असेही नाही किंवा तो फार मोठा गुन्हा घडला असेही नाही. शंकराने विष पचविले म्हणून त्याला महादेव म्हणतात, त्याचप्रमाणे अपयशाचे विष पचवून जो यशाच्या शिखराकडे झेप घेतो त्याला महापुरुष असे म्हणतात. म्हणून परीक्षेत नापास झाल्यावर दु:ख करीत बसण्यापेक्षा किंवा देवाला–दैवाला व शिक्षक–परीक्षक यांना शिव्या देत बसण्यापेक्षा नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपण नापास का झालो याचा शोध घेतला पाहिजे. जेथे परिणाम आहे तेथे कारण हे असतेच. हे कारण शोधून काढण्यात खरे शहाणपण आहे. हे कारण शोधण्यासाठी पालकांनी सुद्धा विद्यार्थ्यांना आवश्यक ते सहाय्य अवश्य करावे. ‘अभ्यास करणे ही कला

आहे' याची जाणीव विद्यार्थ्यांना नसते, त्यांच्या पालकांनाही नसते व बहुतेक शिक्षकांना सुद्धा नसते. म्हणून अभ्यास करण्याची कला विद्यार्थ्यांनी प्राप्त करून घेतली पाहिजे. ह्या कलेचे मार्गदर्शन आधीच्या प्रश्नोत्तरात केलेले आहे.

प्र. २२ नेहमी खरेच का बोलावे ? कृपया मार्गदर्शन करावे.

उत्तर सर्वसाधारणपणे 'खरे बोलणे' स्वत:च्या हिताचे असते. खरे बोलणाऱ्या व्यक्तीवर सर्व लोक विश्वास ठेवतात. समाजात त्यांची पत राहते व आर्थिक संकट किंवा अन्य संकटे आली असता सामान्यपणे समाजातील माणसे त्याच्या सहाय्याला धावतात. याच्या उलट खोटे बोलणाऱ्या व्यक्तीवर कोणी विश्वास ठेवीत नाही. समाजात त्याची पत रहात नाही व संकट प्रसंगी त्याच्या मदतीला कोणी धावून जात नाही. दुसरा मुद्दा असा की, एकदा माणूस खोटे बोलला की ते खोटे पचविण्यासाठी त्याला अनेक वेळा खोटे बोलावे लागते. इतके खोटे बोलून सुद्धा सरते शेवटी सत्य बाहेर येतेच व परिणामी त्या माणसाची पूर्ण फजिती होते. तिसरा मुद्दा असा की, खरे कधी बोलावे व खोटे कधी बोलावे याला सुद्धा कांही तारतम्य आहे. धूर्त–लबाड माणसे, स्वार्थ साधण्यासाठी वाटेल त्या थराला जाणारी माणसे, समाजद्रोही व राष्ट्रद्रोही माणसे यांच्याशी खरे बोलणे धोक्याचे असते. किंबहुना अशा लोकांच्या बाबतीत खोटे बोलून त्यांना मार्गाला लावणे हेच सर्वांच्या हिताचे असते. चौथा मुद्दा असा की खरे बोलण्याने व्यक्तीचे, कुटुंबाचे, समाजाचे किंवा राष्ट्राचे खूप नुकसान होत असेल तर अशा प्रसंगी खोटे बोलून वेळ निभावून नेणे हेच सर्वांच्या हिताचे असते. पांचवा

मुद्दा असा की, पूर्व जीवनात कांही घडलेल्या गोष्टी किंवा घटना ज्या सर्वसाधारणपणे गुप्त ठेवल्या जातात त्या घटना किंवा गोष्टी कुठल्याही परिस्थितीत व कोणालाही उघड करू नये. विशेषकरून स्त्री–पुरुषांनी विवाह झाल्यानंतर ‘खोटे बोलणे पाप आहे’ या कल्पनेच्या आहारी जाऊन किंवा ‘सत्य सांगितले नाही तर मनाला खात राहते’ या भावनेच्या आहारी जाऊन सत्य सांगणे कोणाच्याच हिताचे नसते. थोडक्यात, सामान्यपणे खरे बोलावे व खोटे बोलू नये, परंतु विशेष माणसांच्या व प्रसंगांच्या बाबतीत खरे बोलावे की खोटे बोलावे हे सर्व तारतम्य पाहून ठरवावे.

प्र. २३ एखाद्या विद्यार्थ्याचे घर लहान असेल व त्याचे कुटुंब मोठे असेल, अशा परिस्थितीत अभ्यास करायला मिळत नसेल तर त्याने काय करावे ?

उत्तर मराठीत एक म्हण आहे ‘ज्याला आवड आहे त्याला सवड असते.’ अभ्यास करण्याची आवड असेल किंवा अभ्यास करण्याचे महत्व समजत असेल तर तो विद्यार्थी कुठलीही सबब न सांगता अभ्यास करण्याचा मार्ग शोधेल. माझे स्वत:चे कुटुंब खूप मोठे होते व अशा परिस्थितीत मी इमारतीच्या जिन्यात बसून अभ्यास केला होता. इतिहासात जी माणसे खूप मोठी झाली त्यांच्यापैकी बऱ्याच व्यक्तींनी रस्त्यावरील म्युनिसिपालटीच्या दिव्याखाली बसून अभ्यास केला होता. ठिकठिकाणी अभ्यासिका (वाचनालये) असतात. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत (वाचनालयात) जाऊन अभ्यास करणे शक्य असते. थोडक्यात, ज्या विद्यार्थ्याला

अभ्यास करण्याची तळमळ आहे त्याला मार्ग सापडतोच. म्हणूनच जीवनविद्या सांगते –

''वस्तुस्थितीचा स्वीकार करून तिला सुरेख आकार देण्याच्या प्रयत्नात यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे.''

प्र. २४ कांही विद्यार्थ्यांना घरी संस्कार चांगले मिळतात पण बाहेर समाजात दुषित वातावरण असते, म्हणजे दुराचार, भ्रष्टाचार, अत्याचार, व्यसन इत्यादी. विद्यार्थ्यांनी अशा परिस्थितीत काय करावे?

उत्तर 'पाण्यात राहून माशाशी वैर करू नये' अशी मराठीत एक सुंदर म्हण आहे. या म्हणीप्रमाणे समाजात राहून कोणाशीही वैर करू नये. परंतु वैर करू नये याचा अर्थ कुणाशीही मैत्री करावी असे मात्र नाही. घरामध्ये ज्यांना सुसंस्कार मिळालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना घराबाहेर पडल्यानंतर चांगले काय किंवा वाईट काय व चांगली माणसे कोणती व वाईट माणसे कोणती हे सहज लक्षात येते. अशा परिस्थितीत कोणाशीही वैर न करता अनिष्ट गोष्टी व अनिष्ट माणसे यांच्यापासून युक्तीने दूर रहावे. गंमत म्हणून किंवा भीडेला बळी पडून किंवा दबावाच्या आहारी जाऊन कुठल्याही अनिष्ट गोष्टी करू नयेत. कारण एकदा का पाय घसरला की मग स्वत:ला सावरणे कठीण जाते. दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, विद्यार्थ्यांनी घरी आल्यावर घरातील पालकांना अशा परिस्थितीची जाणीव करून देणे आवश्यक आहे. तिसरा मुद्दा असा की, चांगल्या व सज्जन विद्यार्थ्यांनी दुसऱ्या चांगल्या विद्यार्थ्यांची संगती प्रयत्नपूर्वक मिळविली पाहिजे. या व्यतिरिक्त समाजामध्ये

जीवन विद्या मिशन सारख्या ज्या चांगल्या संस्था आहेत त्या संस्थांच्या संपर्कात रहावे म्हणजे चांगल्या माणसांची चांगली संगती मिळून विद्यार्थ्यांचे कल्याण साधले जाईल. चौथा मुद्दा असा, विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये स्नेहाचे व मैत्रीचे संबंध असले पाहिजेत. जर तसे नसेल व विद्यार्थ्यांना पालकांची भिती वाटत असेल तर विद्यार्थी पालकांजवळ मनमोकळेपणाने त्यांच्या समस्या सांगणार नाहीत. अशा परिस्थितीत काट्याचा नायटा व्हायला वेळ लागणार नाही. म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधावा व त्यांच्या समस्या समजावून घेऊन त्यावर वेळीच उपाययोजना केल्यास सर्वांच्याच दृष्टिने ते हितावह ठरेल.

प्र. २५ कांही विद्यार्थ्यांना त्यांचे आई–वडील किंवा पालक पूजा व इतर कर्मकांड करायला सांगतात ते त्यांना आवडत नाही तर त्यांनी काय करावे?

उत्तर विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्यामध्ये Generation Gap म्हणजे एका पिढीचे अंतर असते. त्यामुळे जुन्या पिढीचे विचार नव्या पिढीला पटत नाहीत. आपण सांगू त्याप्रमाणे आपल्या मुलाने वागले पाहिजे, असा त्यांचा दृष्टिकोन असतो. कर्मकांड करणे चूक की बरोबर हा वादाचा विषय होऊ शकेल, परंतु कर्मकांड करण्यास सांगण्याचा पालकांचा हेतू सामान्यपणे शुद्ध असतो. आपल्या मुलाबाळांचे भले व्हावे, कल्याण व्हावे असे सर्व पालकांना मनापासून वाटत असते. पारंपारिक कर्मकांड न केल्याने देवाचा कोप होईल व आपल्या मुलाबाळांचे अहित किंवा नुकसान होईल अशी भिती पालकांना

वाटत असते, म्हणूनच ते आपल्या मुलांना कर्मकांड करण्यास सांगतात. कर्मकांड पालकांच्या इच्छेस्तव केले तर आकाश कांही कोसळणार नाही, परंतु पालक जर सूज्ञ असतील तर कर्मकांड करण्यात अर्थ नसतो हे शक्य असल्यास, विद्यार्थ्यांनी पालकांना पटवून द्यावे. त्याचबरोबर प्रचलित कर्मकांडांना पर्यायी अशी जी उपासना पद्धती जीवनविद्या मिशनने शिकविलेली आहे ती कशी योग्य आहे, हे सुद्धा विद्यार्थ्यांनी सूज्ञ पालकांना पटवून द्यावे. या संदर्भात जीवनविद्येचा खालील महत्वाचा सिद्धांत विद्यार्थ्यांनी व पालकांनी लक्षात घेतला पाहिजे.

''परमेश्वर कुणावरही कृपा करीत नाही किंवा कोप करीत नाही, तो माणसाच्या जीवनात कुठल्याही प्रकारे ढवळाढवळ किंवा हस्तक्षेप करीत नाही. उलट स्वत: माणूसच स्वत:च केलेल्या सत्कर्मांनी किंवा दुष्कर्मांनी स्वत:वरच कृपा किंवा कोप करीत असतो.''

म्हणून कर्मकांड करण्यापेक्षा कर्मचांग करून स्वत:चे, कुटुंबाचे, समाजाचे व राष्ट्राचे कल्याण साधण्यात सर्वांचेच हित आहे. कर्मचांग करणे म्हणजे ''शुभ चिंतन करणे, शुभ इच्छा करणे, शुभ बोलणे व शुभ करणे'' हे होय.

प्र. २६ परीक्षा जवळ आली की विद्यार्थी शरिराला ताप व त्रास देऊन अभ्यास करतात हे योग्य आहे का ?

उत्तर परीक्षा जवळ आल्यानंतर शरिराला ताप व त्रास देऊन अभ्यास करणे म्हणजे अडाणीपणाचा व मूर्खपणाचा कळस होय. बहुतेक विद्यार्थी हाच मूर्खपणा सामान्यपणे करीत असतात. त्याचे कारण एकच आहे की परीक्षेचे महत्व त्यांना समजलेले

नसते. विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाते त्याचे कारण समजावून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम नेमून दिलेला असतो व त्यासाठी क्रमिक पुस्तके नेमलेली असतात. या पुस्तकांचा व्यवस्थित अभ्यास करून त्यातील ज्ञान संपादन करणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टिने महत्वाचे असते. विद्यार्थ्यांनी अभ्यास करून ज्ञान संपादन केले किंवा नाही हे तपासून पाहण्यासाठीच परीक्षा घेतली जाते. परंतु परीक्षेचा हा मुख्य उद्देश एकतर विद्यार्थ्यांना ज्ञात नसतो किंवा ते त्याकडे दुर्लक्ष करतात. परिणामी परीक्षा तोंडावर आली की कसा तरी अभ्यास करायचा, शरिराला ताप व त्रास द्यायचा व जेमतेम परीक्षेत पास व्हायचे किंवा खूप पाठांतर करून चांगले गुण मिळवायचे. असा प्रकार विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टिने अर्थशून्य असतो, कारण भविष्यात विद्यार्थ्यांनी केलेले पाठांतर किंवा मिळविलेले गुण त्यांच्या विशेष उपयोगी पडणार नाहीत. त्यांच्या उपयोगी पडेल ते त्यांनी संपादन केलेले ज्ञान.

प्र. २७ विद्यार्थ्यांना शिक्षा करू नये असे कांही लोकांचे म्हणणे आहे, याच्या उलट विद्यार्थ्यांना शिक्षा केलीच पाहिजे असे कांही लोकांचे मत आहे. या संदर्भात आपण मार्गदर्शन कराल का ?

उत्तर वस्तुस्थिती अशी आहे की बहुतेक विद्यार्थ्यांना शाळा, शिक्षक, शिक्षण, अभ्यास व अभ्यासाचा मुख्य हेतू यासंबंधी पुरेसे ज्ञान नसते. पालक शाळेत पाठवितात म्हणून शाळेत गेलेच पाहिजे दुसरा इलाज नाही अशी बहुतेक विद्यार्थ्यांची धारणा असते. म्हणून प्रथमपासूनच पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांच्यात ज्ञान संपादन करण्यासाठी

अभ्यासाची गोडी लावली पाहिजे. अभ्यास करण्यात टाळाटाळ केली तर त्याचे दुष्परिणाम भवितव्यात काय होतील याची पुरेशी जाणीव विद्यार्थ्यांना प्रसंगानुरूप करून दिली पाहिजे. असे मार्गदर्शन जर केले गेले तर विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याचा प्रसंगच येणार नाही. परंतु असे मार्गदर्शन करूनही जर विद्यार्थी खोडसाळपणा व उनाडपणा करून अभ्यासाकडे दुर्लक्ष करीत असतील तर त्यांना शिक्षा करणे आवश्यक आहे. मात्र विद्यार्थ्यांना शिक्षा अशी करावी की त्या शिक्षा भोगण्यातून सुद्धा त्यांचे कल्याण व्हावे. उदाहरणार्थ, थोडा वेळ अंगठे धरायला लावणे, उठाबशा काढणे, क्रमिक पुस्तकातील कांही मराठी व इंग्रजी परिच्छेद पाठ करायला लावणे वगैरे. परंतु कुठल्याही परिस्थितीत पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारहाण करू नये.

प्र. २८ पुष्कळ वेळेला विद्यार्थ्यांची अशी अडचण होते की, शिक्षक जे कांही शिकवितात ते समजत नाही अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी काय करावे ?

उत्तर 'शिकविणे' हीच एक मोठी कला आहे व ती कला सर्वांनाच अवगत असते असे नाही. खूप पदव्या घेतलेल्या शिक्षकांना सुद्धा चांगले शिकवता येईलच असे नाही. याच्या उलट कमी पदव्या घेतलेला शिक्षक, विद्यार्थ्यांना उत्तम पद्धतीने शिकवू शकेल. म्हणून शिक्षकाची नेमणूक करताना त्यांना शिकविण्याची कला आहे किंवा नाही याची चाचपणी थोड्याफार प्रमाणात तरी केली गेली पाहिजे. दुसरा मुद्दा असा की, शिक्षकांना चांगले वेतन दिले गेले पाहिजे. कमी वेतनावर चांगले शिक्षक मिळणे कठीणच आहे. तिसरा मुद्दा असा की, शिक्षक विद्यार्थ्यांना

योग्य पद्धतीने शिकवितात किंवा नाही याची चाचपणी मुख्य अध्यापकांनी अधून मधून करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुख्य अध्यापकांनी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांचे शिक्षक त्यांना योग्य पद्धतीने शिकवितात किंवा नाही ह्याची युक्तीने चाचपणी करणे आवश्यक आहे. शेवटचा महत्वाचा मुद्दा असा की, विद्यार्थ्यांनी संबंधीत शिक्षकांना भेटून आपली अडचण त्यांना अत्यंत नम्रपणे सांगावी म्हणजे ते शिक्षक व्यवस्थित शिकविण्याची खबरदारी घेतील.

प्र. २९ विद्यार्थ्यांनी शाळेत किंवा कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर त्यांना चांगले मित्र मिळणे आवश्यक आहे, परंतु चांगले मित्र मिळवायचे कसे ?

उत्तर चांगले किंवा वाईट मित्र मिळण्यावर विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असते. येथे थोडी जरी चूक झाली तरी त्यांचे संपूर्ण जीवनच पार बिघडण्याची शक्यता असते. या संदर्भात जीवन विद्येचा खालील महत्वाचा सिद्धांत विद्यार्थ्यांनी कधीही विसरता कामा नये.

''चांगल्या मुलांची संगत मिळणे कठीण व टिकणे त्याहूनही कठीण असते, परंतु वाईट मुलांची संगत मिळते सहज व टिकतेही सहज''

म्हणून विद्यार्थ्यांनी संगत धरण्यात अत्यंत सावध असले पाहिजे. चांगला विद्यार्थी व वाईट विद्यार्थी ओळखणे तसे फारसे कठीण नाही. विद्यार्थ्यांचे विचार–उच्चार–आचार याचे थोडे जरी निरीक्षण केले तरी विद्यार्थी चांगला आहे का वाईट आहे, हे सहज ओळखता येते. संगत धरण्यापूर्वी या गोष्टीचा विचार

विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. एकदा का वाईट संगत मिळाली की मग त्या अनिष्ट संगतीच्या प्रवाहात वाहत जाऊन ते विद्यार्थी अधोगतीला जाण्याचा मोठा संभव असतो. त्याचप्रमाणे पालकांनी सुद्धा आपल्या मुलावर नजर ठेवली पाहिजे. कांहीतरी निमित्त साधून उदाहरणार्थ (वाढदिवस वगैरे) मुलांच्या मित्रांना घरी बोलावून त्यांच्या बोलण्या–चालण्यावर लक्ष ठेवून त्या मित्रांची योग्य ती पारख केली पाहिजे. अशी पारख केल्यानंतरच पालकांनी आपल्या मुलांना चांगल्या मुलांचीच संगत धरण्यास प्रवृत्त केले पाहिजे. त्याचप्रमाणे पालकांनी चांगल्या विद्यार्थ्यांना कांही निमित्त साधून वारंवार घरी बोलावून त्यांची संगत दृढ करण्यास आपल्या मुलांना सहाय्य केले पाहिजे. आणखीन एक महत्वाचा मुद्दा असा की, आपल्या मुलांचे कल्याण साधण्याच्या दृष्टीने पालकांनी शाळेत जाऊन शिक्षकांना व मुख्याध्यापकांना भेटून आपली मुले शाळेत कशी वागतात व त्यांची अभ्यासात प्रगती कशी काय चाललेली आहे, याची अधून–मधून विचारपूस केली पाहिजे. आपले पालक अशा तऱ्हेने चौकशी करण्यास शाळेत येतात हे पाहून मुले अनिष्ट मार्गाला जाण्यास धजावणार नाहीत. थोडक्यात, 'संगत धरण्यात विद्यार्थ्यांनी अत्यंत सावध असले पाहिजे कारण सत्याचा साक्षात्कार घडवून आणण्याचे किंवा पूर्ण सत्यानाश करण्याचे प्रचंड सामर्थ्य संगतीत आहे' म्हणून आपल्या मुलांना सज्जन लोकांची संगत मिळेल अशी काळजी घेणे व त्याप्रमाणे चिकाटीने व्यवस्था करणे हे प्रत्येक पालकाचे मुख्य कर्तव्य आहे.

प्र. ३० विद्यार्थ्यांचे आई–वडीलच जर अनिष्ट गोष्टी करत असतील, उदाहरणार्थ दारू पिणे, सिगारेट ओढणे, गुटखा खाणे, शेजाऱ्यांशी भांडण, तंटे–बखेडे करणे, तर अशा परिस्थितीत मुलांनी त्यांना देव का मानावे ?

उत्तर आई–बाप कसेही असले तरी त्यांचे मुलांवर ऋण असते. मुलांना जन्म देणे, त्यांचे लालन, पालन, पोषण, संवर्धन, शिक्षण वगैरे गोष्टी आई–वडील करीतच असतात. विद्यार्थ्यांनी पालकांचे हे ऋण लक्षात घेऊन त्यांना देवासमान मानण्याचा प्रयत्न केला पाहिजे व सकाळी उठल्यावर आपल्या आई–वडीलांच्या पायावर मनोभावे मस्तक ठेवून वंदन केले पाहिजे. त्याचबरोबर सर्वांना (त्यात विद्यार्थ्यांचे आई–वडील आलेच) चांगली बुद्धी देण्यास देवाजवळ प्रार्थना करावी. देवासमोर उभे राहून घरातील सर्वांना ऐकू जाईल अशा पद्धतीने जीवनविद्येची विश्वप्रार्थना उच्च स्वरात म्हणावी. विश्वप्रार्थना नेहमी ऐकल्याने अनेक अनिष्ट गोष्टी करणाऱ्या पालकांचे परिवर्तन झाल्याचे कित्येकांना अनुभव आलेले आहेत.

प्र. ३१ शाळेतील शिक्षकच सिगारेट, दारू, गुटखा वगैरे व्यसन करीत असतील तर अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर का करावा ?

उत्तर शिक्षक जरी व्यसनी असले तरी जोपर्यंत विद्यार्थी शाळेत जाऊन शिकत असतात तोपर्यंत 'शिक्षक' या पवित्र नात्याने विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडे देवासमान पाहिले पाहिजे व त्यांचा आदर केला पाहिजे. शिक्षक, विद्यार्थ्यांना शिकवितात हा महत्वाचा मुद्दा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षकाकडे 'देव' या भावनेने

पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही गोष्ट विद्यार्थ्यांनी कर्तव्य भावनेने केली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शिक्षकाकडे पाहण्याच्या निर्मळ व पवित्र दृष्टीने व भावनेने त्या शिक्षकातच परिवर्तन होण्याची दाट शक्यता असते. वर्गातील विद्यार्थी शिक्षकांकडे ते 'ज्ञान देणारे देव' या भावनेने पाहू लागले की विद्यार्थ्यांच्या पवित्र भावनांचे स्पंद (Vibrations) शिक्षकाच्या दिशेने प्रक्षेपीत झाल्यामुळे त्यांचा शिक्षकांवर निश्चित परिणाम होऊन शिक्षकांत आवश्यक ते परिवर्तन घडून येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे आपल्या शिक्षकांना अनिष्ट व्यसन सोडण्याची सद्बुद्धी होवो अशी विद्यार्थ्यांनी देवाजवळ प्रार्थना करावी. विद्यार्थ्यांनी सामुहिक पद्धतीने जीवनविद्येची विश्वप्रार्थना म्हटल्यास सर्वांचेच भले होईल. दुसरा मुद्दा असा की, शिक्षकांनी सुद्धा जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. शिक्षकच जर अनिष्ट गोष्टी व अनिष्ट व्यसने करू लागले तर त्यांचा विद्यार्थ्यांवर काय महाभयंकर परिणाम होईल याचा शिक्षकांनी विचार करायला नको का ? विद्यार्थी म्हणजे उद्याचे राष्ट्राचे नागरिक तेच जर बिघडले तर आपल्या राष्ट्रावर काय भयंकर संकट कोसळेल याचा विचार शिक्षकांनी करायचा नाही तर कोणी करायचा ? आपण ज्या घरात रहातो ते घर जर कोसळले तर आपला सर्वनाश होणे अटळ आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थीच जर बिघडले तर राष्ट्रावर संकट कोसळून त्यात सर्वांचाच सर्वनाश होईल याची योग्य ती जाणीव ठेवून, शिक्षकांनी स्वत: जबाबदारीने वागावे व विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने सुसंस्कारीत करून स्वत:चे, समाजाचे व राष्ट्राचे कल्याण

साधावे.

प्र. ३२ विद्यार्थ्यांनी सध्याच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी नेमके काय करावे?

उत्तर स्पर्धेचे युग हे आताच आहे व पूर्वी नव्हते अशातला कांही भाग नाही. लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीमुळे ही स्पर्धा अधिक तीव्र झालेली आहे एवढेच. स्पर्धेमध्ये टिकून रहायचे असेल तर विद्यार्थ्यांनी जीवनविद्येचे खालील सिद्धांत नित्य स्मरणात ठेवले पाहिजेत.

१) तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.

२) देवासकट सर्व कांही प्राप्त करून देण्याचे प्रचंड सामर्थ्य प्रयत्नात आहे म्हणून प्रयत्न हे रत्न देवापेक्षाही श्रेष्ठ होय.

३) अभ्यासाचा कंटाळा म्हणजे भाग्याला टाळा.

४) ज्ञानी उपयुक्त माणूस सर्वत्र सर्वांनाच हवा असतो. कुठल्याही स्पर्धेत तो टिकून राहातो. म्हणूनच जीवनविद्या सांगते –

"तुम्ही ज्ञानी व्हा, तुम्ही हुशार व्हा
तुम्ही बुद्धीवान व्हा सारे."

प्र. ३३ शाळेत शिकत असताना विद्यार्थ्यांनी पुढे काय व्हावे हे त्यांनी ठरवायचे कसे व त्यासाठी प्रयत्न कसे करावे?

उत्तर जन्माला आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांत कांही ना कांही विशिष्ट गुण असतात. परंतु बहुतेक विद्यार्थ्यांना या सत्याची जाणीव नसते. अंगी असणारे हे गुण, 'आवड' या स्वरुपात प्रगट होतात. पुष्कळ वेळेला, प्रसंगी निर्माण झालेली परिस्थिती, हे

गुण प्रगट होण्यास कारणीभूत ठरतात. म्हणून भविष्यात विद्यार्थ्यांनी काय व्हावे हे त्यांनी व त्यांच्या पालकांनी, विद्यार्थ्यांची आवड व त्यांच्या अंगी असणारे गुण लक्षात घेऊन ठरवावे. कुठल्याही परिस्थितीत पालकांनी विद्यार्थ्यांवर 'तू अमूक हो किंवा तमूक हो' अशी जबरदस्ती करू नये. समाजासाठी उपयुक्त असणारे सर्व व्यवसाय हे श्रेष्ठच असतात. त्यात उच्च किंवा नीच असा प्रकार नसतो. कुठलाही व्यवसाय स्विकारला तरी विद्यार्थ्यांनी मनोभावे अभ्यास करून प्रयत्नपूर्वक त्या क्षेत्रात उच्चपदी (Top) जाण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे करिअर कौन्सिलींगच्या कांही संस्था, आपल्या आवडीप्रमाणे कोणते व्यवसाय किंवा नोकरी क्षेत्र पुढे निवडावे, त्याला पुढे भवितव्यात काय मागणी (Scope) आहे व आतापासून त्याची नियोजनबद्ध, शिस्तबद्ध तयारी कशी करावी, असा सल्ला देतात. तसेच अधूनमधून कांही संस्था या संदर्भात प्रदर्शनेही भरवितात व तेथे चित्रांद्वारे वगैरे आपल्याला विविध व्यवसाय व नोकऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करतात. एकाच ठिकाणी सगळे पुढील मार्गाचे विश्लेषण आपल्यासमोर असल्यामुळे आपल्या आवडीप्रमाणे आपण पुढे काय करावे हे ठरविण्यास मदत होते. त्याचप्रमाणे कांही व्यवसाय व नोकरी विषयक पुस्तके, मासिके वगैरे मिळतात, ज्यामध्ये विस्तृतपणे माहिती असते. त्यांचीही भवितव्यात कोणता व्यवसाय करावा व कोणती नोकरी पत्कारावी हे ठरविण्यास आपण मदत घेऊ शकतो व त्यासाठी तयारी आतापासून करू शकतो.

प्र. ३४ हल्ली फॅशनचे युग आहे विद्यार्थ्यांनी फॅशन करणे चांगले की

वाईट ?

उत्तर फॅशन करायची की न करायची हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीवर अवलंबून असते. फॅशन करण्यात कांही वाईट आहे अशातला भाग नाही. मनापासून फॅशन करण्याची आवड असेल तर विद्यार्थ्यांनी थोड्या फार प्रमाणात फॅशन अवश्य करावी. परंतु फॅशन करता करता आपले पालक फिनिश (Finish) होणार नाहीत याची योग्य ती काळजी विद्यार्थ्यांनी घेतली पाहिजे. आपल्या पालकांच्या सांपत्तिक स्थितीला परवडेल व त्यांना कुठल्याही प्रकारे उपद्रव होणार नाही, हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी मर्यादित स्वरुपात फॅशन करायला कांही हरकत नाही. नीट–नेटकेपणे राहण्यासाठी व व्यवस्थित दिसण्यासाठी फॅशन अवश्य करावी. परंतु कुठल्याही परिस्थितीत इतरांवर विशेषत: मुलींवर इम्प्रेशन (Impression) मारण्यासाठी किंवा इतरांशी फॅशनमध्ये स्पर्धा करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अती फॅशन करू नये. तसे करण्यात विद्यार्थ्यांचे व पालकांचे नुकसान होण्याची दाट शक्यता असते. दुसरा मुद्दा असा, फॅशन करण्याच्या नादात विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होता कामा नये. तिसरा मुद्दा असा की, फॅशन करण्यात मोठेपणा आहे अशातला भाग नाही, उलट तसे करण्यात थिल्लरपणाच दिसून येतो. जे सूज्ञ व शहाणे लोक असतात त्यांना फॅशन करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा ज्यांची 'साधी रहाणी व उच्च विचारसरणी' (Simple Living and High Thinking) आहे असेच विद्यार्थी अधिक आवडतात.

प्र. ३५ धर्म, जाती, जमाती, प्रांत वगैरे कारणास्तव शिक्षकांकडून व

इतरांकडून पक्षपात होत असल्यास विद्यार्थ्यांनी काय करावे?

उत्तर जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून धर्म, वंश, जात, जमात, पंथ, प्रांत, भाषा वगैरे प्रकारांना कुठल्याही परिस्थितीत, कुठल्याही कारणास्तव व कोणाच्याही बाबतीत थारा देता कामा नये. माणसामाणसात भेदाभेद करणे व माणसांनी एकमेकांवर अन्याय करणे म्हणजे देवाच्या दरबारात फार मोठा गुन्हा करण्यासारखे आहे. म्हणून शिक्षकांनी किंवा कोणीही इतरांनी धर्माच्या किंवा जातीच्या नांवाखाली पक्षपात करणे अत्यंत गैर आहे. शिक्षकांनीच जर असे अनिष्ट आचरण केले तर विद्यार्थ्यांवर अनिष्ट संस्कार होऊन त्याचे गंभीर परिणाम भविष्यात विद्यार्थ्यांना, समाजाला व राष्ट्राला भोगावे लागले तर त्यात आश्चर्य करण्यासारखे कांही नाही. थोडक्यात, विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या दृष्टीने व राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने धर्माच्या व जातीच्या नांवाखाली विद्यार्थ्यांत पक्षपात होता कामा नये, असा जीवनविद्येचा स्पष्ट दृष्टिकोन आहे. परंतु असा पक्षपात जर विद्यार्थ्यांकडून किंवा इतरांकडून होत असेल तर विद्यार्थ्यांनी नम्रपणे प्रथम शिक्षकाकडे व नंतर आवश्यक असल्यास मुख्याध्यापकांकडे तक्रार करावी.

प्र. ३६ विद्यार्थ्यांनी रॅगिंग Ragging मध्ये भाग घ्यावा का? व ज्या विद्यार्थ्यांवर Ragging होण्याचे प्रसंग येतात त्यांनी आपले रक्षण कसे करावे?

उत्तर रॅगिंग हा अत्यंत अनिष्ट, किळसवाणा, नीच व भयंकर प्रकार आहे. विद्यार्थी जीवनाला काळीमा फासणारा हा रॅगिंगचा प्रकार आहे. कुठल्याही परिस्थितीत व कुठल्याही कारणास्तव रॅगिंगचा

प्रकार घडणार नाही याची योग्य ती दक्षता सर्वच संबंधितांनी घेतली पाहिजे. रॅगिंग करण्यात भूषण नसून दूषण आहे व तसे करण्यात विकृत मनोवृत्तीचे प्रदर्शन घडते. रॅगिंग केल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. रॅगिंगच्या भितीने विद्यार्थी कॉलेज सोडतात व कांही विद्यार्थी आत्महत्या सुद्धा करतात. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या पालकांनी अत्यंत दक्ष राहिले पाहिजे. वारंवार चौकशी करून आपल्या विद्यार्थ्यांवर रॅगिंग होणार नाही, याची काळजी व दक्षता पालकांनी घेतलीच पाहिजे. एवढी दक्षता घेऊन सुद्धा जर रॅगिंग झाले तर विद्यार्थ्यांनी व पालकांनी तात्काळ कॉलेजच्या प्राचार्यांकडे व पोलीसांकडे रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांची नांवे सांगून योग्य ती तक्रार नोंदवावी व संबंधीत रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर योग्य ती कारवाई करावी. परंतु कुठल्याही परिस्थितीत भिडेला बळी पडून किंवा भितीच्या आहारी जाऊन विद्यार्थ्यांनी व पालकांनी गप्प बसू नये. मराठीत एक सुंदर म्हण आहे, 'वाघ म्हटले तरी खातो व वाघोबा म्हटले तरी खातो.' त्याचप्रमाणे रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विरुद्ध पोलीस तक्रार केली तरी त्रास होणार व नाही केली तरी त्रास होणार. अशा परिस्थितीत रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विरुद्ध पोलीस तक्रार करणे हेच योग्य ठरेल. कारण यदाकदाचित आत्महत्येसारख्या अनिष्ट घटना घडल्या तर रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विरुद्ध पोलीस कारवाई करता येणे शक्य होईल. त्याचप्रमाणे प्राचार्यांनी व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या दृष्टीने त्यांच्याशी संपर्क ठेवून रॅगिंग होते किंवा नाही याची खाजगीरित्या

(Confidentially) विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन चौकशी करावी.

प्र. ३७ हॉस्टेलमध्ये नियमानुसार तीन मुलांना एक रूम मिळते. त्यात व्यसनी व वाईट मुलेही असतात व ती मुले चांगल्या मुलास व्यसन करण्यास जबरदस्ती करतात. अशा वेळी विद्यार्थ्यांनी काय करावे ?

उत्तर अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांशी तात्काळ संपर्क साधून गंभीर परिस्थितीची त्यांना जाणीव करून दिली पाहिजे. विद्यार्थ्यांनी पालकांना अशी जाणीव करून दिल्यानंतर त्या पालकांनी तात्काळ प्राचार्यांशी संपर्क साधून खोली बदलून घ्यावी. कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांनी भिडस्तपणाला बळी पडून किंवा भितीच्या आहारी जाऊन गप्प बसता कामा नये. त्याचप्रमाणे प्राचार्यांनी व हॉस्टेलच्या रेक्टरने व्यसन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन योग्य ते मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्राचार्यांनी अशा व्यसनी विद्यार्थ्यांच्या पालकांशी लेखी व प्रत्यक्ष संपर्क साधावा व त्यांना त्यांच्या मुलांच्या व्यसनासंबंधी व दुर्वर्तनाबद्दल जागृत करावे.

प्र. ३८ कॉलेजमध्ये कांही मुले मौजमजा म्हणून दारू पितात, सिगारेट ओढतात, गुटखा खातात वगैरे अनिष्ट गोष्टी करतात. अशी ही मुले व्यसन न करणाऱ्या विद्यार्थ्यांची चेष्टा–कुचेष्टा करतात अशा परिस्थितीत या विद्यार्थ्यांनी काय करावे ?

उत्तर व्यसनाधीन झालेली मुले अनिष्ट गोष्टींच्या आहारी जातात, याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन करण्याची तसदी त्यांच्या पालकांनी व शिक्षकांनी घेतलेली

नसते. अशा व्यसनी मुलांना योग्य मार्गदर्शन वेळीच मिळाले तर ती मुले व्यसनांच्या आहारी जाणार नाहीत, असा जीवनविद्येचा स्पष्ट सिद्धांत आहे. म्हणून अशा व्यसनी मुलांना युक्ती–प्रयुक्तीने योग्य ते मार्गदर्शन मिळेल अशी काळजी त्यांच्या पालकांनी घेतली पाहिजे. शरीर म्हणजे परमेश्वराची जीवंत मूर्ती किंवा जीवंत दिव्य कॉम्प्युटर असून त्या शरिराला तुम्ही जे इष्ट किंवा अनिष्ट फिडींग कराल त्याचप्रमाणे तुम्हाला चांगले किंवा वाईट रिझल्टस् निसर्ग नियमाप्रमाणे मिळतील, हा जीवनविद्येचा मौल्यवान सिद्धांत आहे. जर हा सिद्धांत व व्यसनांचे भयंकर दुष्परिणाम विद्यार्थ्यांना नीट समजावून दिले तर कोणीही विद्यार्थी व्यसनांच्या नादी लागणार नाही. व्यसन करणे म्हणजे स्वत:च्याच पायावर स्वत:च भला मोठा धोंडा घालण्यासारखे होय. त्याचप्रमाणे व्यसन करणे म्हणजे महाभयंकर पिडा विकत घेणे होय. आपण भयंकर पिडा व्यसनांच्या रुपाने विकत घेतो व स्वत:च्याच पायावर स्वत:च धोंडा मारून घेतो, हे सत्य विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले तर विद्यार्थी व्यसनांच्या आहारी जाणार नाहीत हे निश्चित. थोडक्यात, व्यसन न करणाऱ्या मुलांनी व्यसन करणाऱ्या मुलांच्या आहारी कुठल्याही परिस्थितीत न जाता त्यांना युक्ती–प्रयुक्तीने योग्य ते मार्गदर्शन प्रबोधनाच्या व पुस्तकांच्या द्वारे मिळेल अशी व्यवस्था केल्याने सर्वांचेच कल्याण होईल.

प्र. ३९ शाळा–कॉलेजमध्ये जाणारे कांही विद्यार्थी–विद्यार्थीनी प्रेमात पडतात, असे करणे योग्य आहे का?

उत्तर विद्यार्थ्यांना त्यांचे पालक शाळा–कॉलेजमध्ये पाठवितात ते

शिक्षण घेण्यासाठी, प्रेम करण्यासाठी नाही, हे प्रत्येक विद्यार्थ्याने सर्वप्रथम लक्षात ठेवले पाहिजे. कर्तव्यधर्म सोडून जे वागतात त्यांच्यावर भविष्यात पश्चात्ताप करण्याची पाळी येते. अभ्यास करून शिक्षण घेणे हा विद्यार्थ्यांचा कर्तव्यधर्म होय. हा कर्तव्यधर्म सोडून प्रेम करण्याच्या फंदात पडणे म्हणजे संकटांना आमंत्रण देणे होय. शाळा–कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थीनींकडून पालकांच्या व शिक्षकांच्या फार मोठ्या अपेक्षा असतात. हाडाची काडे करून व पोटाला चिमटा घेऊन, बहुतेक पालक विद्यार्थ्यांना ऐपत नसताना, कर्ज काढून सुद्धा शाळा–कॉलेजमध्ये पाठवित असतात. विद्यार्थ्यांनी उत्तम शिकावे, उत्कृष्ट ज्ञान संपादन करावे व भविष्यात योग्य तो व्यवसाय निवडून राष्ट्राला प्रगतीपथावर नेणारे राष्ट्राचे उत्तम नागरिक व्हावे, अशी पालकांची विद्यार्थ्यांकडून अपेक्षा असते. परंतु प्रत्यक्षात जर विद्यार्थी अभ्यास करण्याच्या ऐवजी प्रेम करू लागले तर तसे करण्याने ते विद्यार्थी स्वत:ला फसवितात, पालकांना फसवितात, शिक्षकांना फसवितात व देवालाही फसवितात. अशा तऱ्हेने फसविणे हा फार मोठा गुन्हा असतो हे निराळे सांगायला नको व गुन्हेगार म्हटला की त्याला निसर्ग नियमाप्रमाणे शिक्षा होतेच. दुसरा मुद्दा असा की, 'प्रेम' ही गोष्टच मुळात अलौकिक आहे व असे अलौकिक प्रेम करणारी माणसेही अलौकिक असतात. अशी अलौकिक माणसे क्वचित दृष्टीस पडतात. अशा या अलौकिक प्रेमात त्याग असतो, भोग नसतो आणि अलौकिक प्रेम करणारी अलौकिक माणसे एकमेकांच्या सुखासाठी सर्वस्वाचा त्याग करायला तत्पर असतात. प्रेम सफल झाले

नाही तर आपला प्रियकर किंवा आपली प्रेयसी पृथ्वीच्या पाठीवर जेथे असेल तेथे सुखात असू दे, अशीच त्या अलौकिक प्रेम करणाऱ्यांची धारणा असते. अशी ही अलौकिक प्रेम करणारी माणसे शरिरावर प्रेम करीत नाहीत तर ती प्रेम करतात त्यांच्या गुणांवर; प्रत्यक्षात मात्र उलट परिस्थिती दिसून येते. विद्यार्थी–विद्यार्थीनी केवळ लैंगिक आकर्षणाच्या शारिरीक मोहाच्या आधीन होऊन प्रेम करण्याचे नाटक करतात व पुढे त्याच नाटकाचा तमाशा करतात. मुळात ते प्रेम नसून लैंगिक आकर्षण असल्यामुळे अशा प्रेमात केवळ भोगाची लालसा असते, त्यागाचे नांव सुद्धा नसते. कांही कारणामुळे हे लैंगिक आकर्षणरुपी प्रेम सफल झाले नाही तर तथाकथित प्रेम करणारे हेच प्रेमवीर एकमेकांचा जीव सुद्धा घेण्यास प्रवृत्त होतात. त्याचप्रमाणे प्रेमविवाह होण्यापूर्वी प्रियकर–प्रेयसी एकमेकांना विविध प्रकारे आळवितात, गोंजारतात व असंख्य आणा–भाका वाहतात. 'मी तुझ्या शिवाय जगूच शकत नाही' असे प्रियकर व प्रेयसी एकमेकांना प्रेम करताना किंवा प्रेमविवाह होण्यापूर्वी शपथेवर सांगत असतात. अशा प्रकारे ही प्रेमी युगुले एकमेकांशी फिल्मी डायलॉग मारण्यात पटाईत व सराईत असतात. अशा फिल्मी डायलॉगना तरुण मुले–मुली भाळल्या नाहीत व शेवटी बळी पडल्या नाही तरच नवल. या प्रेम करणाऱ्या युगुलांच्या विवाहापूर्वी केलेल्या गुलगुल गोष्टी व घेतलेल्या शपथा इतक्या गुळगुळीत व दांभिक असतात की विवाह झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आतच दंभस्फोट होऊ लागतो आणि वर्षा दोन वर्षांच्या आतच हे प्रेमवीर घटस्फोट

घेऊन मोकळे होतात. थोडक्यात, शहाण्या विद्यार्थ्यांनी या प्रेमाच्या लफड्यात न पडणे त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने हितावह आहे. या संदर्भात आणखीन एक महत्वाचा मुद्दा स्पष्ट करणे इष्ट वाटते. 'प्रेम करणे' व 'प्रेमाचे चाळे करणे' या दोन गोष्टी भिन्न आहेत. प्रेम करण्यासाठी शहाणपण लागते तर प्रेमाचे चाळे करण्यास अक्कल लागत नाही. अक्कलशून्य माणसे सुद्धा प्रेमाचे चाळे करू शकतात. शाळा कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय पहाता ते सर्वार्थाने अपरिपक्व (Immature) असतात. 'प्रेम कशाशी खातात' हे सुद्धा त्यांना माहित नसते. पोरवय, पोरबुद्धी व पोरकट चाळे यातून आयुष्याचा पोरखेळ झाला तर नवल वाटण्याचे कारण नाही. शारिरीक सौंदर्य, ऐश्वर्य, वैभव, श्रीमंती, पैसा, क्रिकेट, टेनीस वगैरे खेळांतील प्राविण्य, खोटी आश्वासने व फॅशनेबल पोशाखीपणा या सर्व उथळ गोष्टींना प्राधान्य देऊनच विद्यार्थी–विद्यार्थीनी प्रेमात पडतात. 'पडतात' हा शब्दच मोठा अर्थपूर्ण आहे. कारण प्रेमाच्या खड्ड्यात जे पडतात ते पुन्हा उठतच नाहीत. प्रेम करणारे हे प्रेमवीर प्रेम प्रकरण रंगवण्याच्या काळांत हवेत अक्षरशः तरंगत असतात. परंतु विवाह झाल्यानंतर मात्र या प्रेमवीरांचे पाय जमिनीला लागतात, पायाला काटे व खडे बोचू लागतात व वास्तवतेचे दर्शन घडून त्यांच्यावर डोळे पांढरे होण्याची पाळी येते. याचे मुख्य कारण असे की, वर कथित केलेल्या सर्व उथळ गोष्टी भवितव्यात जीवन किंवा संसार सुखी व यशस्वी करण्यास समर्थ ठरत नाहीत. 'प्रेम आंधळे असते' अशी म्हण आहे. परंतु प्रत्यक्षात प्रेम आंधळे

नसते तर प्रेम करणाऱ्या प्रेमवीरांची बुद्धी आंधळी झालेली असते. शंभरापैकी ९९ टक्के प्रेम प्रकरणे व प्रेमविवाह अयशस्वी होतात असा सर्वत्र अनुभव आहे. ''काय भुललासी वरलिया रंगा'' असाच प्रकार या प्रेमवीरांचा असतो. परंतु एक टक्का प्रेम प्रकरणे व प्रेमविवाह यशस्वी होतात. त्याचे कारण हे प्रेम करणाऱ्या माणसांजवळ 'शहाणपण' असते. चांगला स्वभाव, उत्तम शिक्षण, उत्कृष्ट संस्कार, समंजसपणा, निर्व्यसनीपणा, आर्थिक स्वावलंबन व कर्तृत्व अशा गोष्टी लक्षात घेऊन जे प्रेम केले जाते त्या प्रेमात शहाणपण असल्यामुळे हे प्रेम करणारी माणसे जीवनात सुखी व यशस्वी होतात.

थोडक्यात, "Life is not a bed of roses" हे विद्यार्थ्यांनी नित्य स्मरणात ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे "Life is a bed of thorns" असा कटू अनुभव भविष्यात आपल्या वाट्याला येऊ नये असे वाटत असेल तर विद्यार्थ्यांनी वस्तुस्थितीचा स्वीकार करून शहाणपणाची कास धरून यशस्वी जीवनाकडे गरूडझेप घेणे आवश्यक आहे.

प्र. ४० विद्यार्थ्यांना अनेक विषयांचा अभ्यास करावा लागतो. त्यापैकी कांही विषय खूप आवडीचे होतात तर कांहींचे नांव जरी काढले तरी कंटाळा येतो, असे का होते ?

उत्तर आपल्या जीवनाचे मन हे केंद्र आहे. कांही वेळा हे मन आपल्याला अनुकूल असते तर कांही प्रसंगी हे मन आपल्याला प्रतिकूल असते. मनाच्या अनुकूलतेवर किंवा प्रतिकूलतेवर आपल्या जीवनाचे तारू हेलकावे खात असते. कांही विषय आपल्याला आवडतात याचे मुख्य कारण आपले मन त्या

विषयात रस घेत असते. त्याचप्रमाणे जे विषय आपल्या बुद्धीला सहज आकलन होतात ते विषय मनाला आवडतात. जे विषय मनाला आवडतात त्याच विषयांचा अभ्यास करण्यास मनाला आनंद वाटत असतो. याच्या उलट कांही विषय बुद्धीला आकलन होत नाहीत अशा विषयांचा मनाला कंटाळा येतो. ज्या विषयांचा मनाला कंटाळा येतो त्या विषयांचा अभ्यास करण्याकडे मन प्रवृत्त होत नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थी नावडत्या विषयांकडे दुर्लक्ष करतात किंवा पाहिजे तेवढा त्या विषयांचा अभ्यास करीत नाहीत. परिणामी विद्यार्थी त्या विषयात नापास होतात किंवा त्या विषयात त्यांना कमी गुण मिळतात. अशा परिस्थितीत आपण काय मार्ग काढावा हे विद्यार्थ्यांना सूचत नाही. या संदर्भात जीवनविद्या विद्यार्थ्यांना उत्तम मार्ग दाखविते. अभ्यास करीत नाही म्हणून ते विषय बुद्धीला आकलन करता येत नाही व बुद्धीला आकलन होत नाही म्हणून ते विषय आवडत नाहीत असे आहे हे दुष्ट चक्र. हे दुष्ट चक्र विद्यार्थ्यांनीच तोडले पाहिजे. जीवनविद्येच्या थ्री आर फॉर्म्युल्या प्रमाणे (3 R Formula) जर विद्यार्थ्यांनी अभ्यास केला तर ते विषय विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रमाणात चांगले समजू लागतात व जसजसा विषय समजू लागतो त्या प्रमाणात मन त्या विषयांच्या अभ्यासात रस घेऊ लागल्यामुळे विद्यार्थ्यांना त्या विषयांची गोडी वाटू लागते. दुसरा मुद्दा असा, जे विषय विद्यार्थ्यांना आवडत नाहीत त्या विषयांचे योग्य मार्गदर्शन योग्य व्यक्तीकडून घेणे त्यांना हितावह ठरेल. हे मार्गदर्शन वर्गातील हुशार विद्यार्थ्यांकडून घ्यावे किंवा शिक्षकांकडून घ्यावे

किंवा पालकांकडून घ्यावे. वेळीच मार्गदर्शन घेऊन अभ्यास केला तर ते विषय समजू लागतात व त्यांची गोडी हळूहळू लागत जाते. तिसरा मुद्दा असा, सर्व विषयांचा अभ्यास केल्याशिवाय व चांगले गुण मिळविल्याशिवाय पर्याय नाही ही महत्वाची गोष्ट विद्यार्थ्यांनी नित्य लक्षात ठेवली पाहिजे. अभ्यास करणे याचा अर्थच एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करणे. अभ्यासाला कांहीही अशक्य नाही हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीने अभ्यास केला तर नावडते विषय सुद्धा हळूहळू आवडते होऊ लागतात. थोडक्यात ''अभ्यासाचा कंटाळा म्हणजे भाग्याला टाळा'' हा जीवनविद्येचा सिद्धांत नित्य लक्षात ठेवून विद्यार्थ्यांनी कसून अभ्यास करावा.

प्र. ४१ ''तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार'' असे जीवनविद्या सांगते मग नशीब घडण्याची प्रक्रिया काय व कशी आहे?

उत्तर दैव किंवा नशीब यासंबंधी जनमानसात खूप गैरसमज आहेत. दैव किंवा नशीब आकाशातून खाली पडत नाही किंवा जमिनीतून वर उगवत नाही. माणसे जीवनात सतत कर्म करीत असतात. विचार–उच्चार–आचार ही कर्मांची तीन तोंडे आहेत. निसर्गाचे नियम व माणसांची कर्मे (Actions) यांचा परस्पर संबंध अत्यंत महत्वाचा आहे. आपण जी कर्मे (Actions) करतो ती कर्मे निसर्गाच्या नियमांना गती देतात व त्या गतीतून जी निर्मिती होते तिला नियती असे म्हणतात. ही नियती जेव्हां फलद्रुप होते तेव्हां ती सुख–दुःखाच्या रुपाने माणसाच्या अनुभवाला येते. हा विषय अधिक समजावून घेण्यासाठी ''तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार'' हे आमचे पुस्तक

अभ्यासपूर्वक वाचावे.

प्र. ४२ विश्व प्रार्थना म्हटल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासात प्रगती करता येईल का ?

उत्तर जीवनविद्येने शिकविलेली विश्व प्रार्थना खालील प्रमाणे आहे :
''हे ईश्वरा,
सर्वांना चांगली बुद्धी दे, आरोग्य दे,
सर्वांना सुखात, आनंदात, ऐश्वर्यात ठेव,
सर्वांचं भलं कर, कल्याण कर, रक्षण कर,
आणि तुझे गोड नाम मुखात अखंड राहू दे.''

विश्व प्रार्थना म्हटल्याने अभ्यासात काय, पण जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगती होते. विश्व प्रार्थना विद्यार्थ्यांनी अभ्यास सोडून करायची नसते तर अभ्यास केल्यानंतर जो कांही रिकामा वेळ मिळेल तेव्हां म्हणायची असते. त्याचप्रमाणे अभ्यास केल्यानंतर रात्री झोपण्यापूर्वी थोडा वेळ विश्वप्रार्थना म्हटल्यास, बहिर्मनाला स्थिरता प्राप्त होऊन, केलेला अभ्यास अंतर्मनात मुरण्यास मदत होते. अंतर्मनात मुरलेला हा अभ्यास परीक्षेच्या वेळी अंतर्मनातून बहिर्मनात प्रसवू लागतो व त्यामुळे परीक्षेत विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळू शकते.

प्र. ४३ समाजात शिकले सवरलेले पदवीधर बेकार फिरताना दिसतात त्याचवेळी शिक्षणाचा गंध नसलेले लोक राजकारणात शिरून दादागिरीच्या जोरावर गडगंज संपत्ती जमा करून बसलेले दिसतात. अशा वेळी विद्यार्थ्यांनी नेमके काय करावे तेच समजेनासे होते. तरी कृपया मार्गदर्शन करावे.

उत्तर सर्व अरिष्ट व अनिष्ट गोष्टींना प्रमुख कारण एकच आहे व ते

म्हणजे लोकसंख्येमध्ये प्रचंड होत असलेली वाढ, हे होय. नोकऱ्या कमी व पदवीधर संख्येने अधिक. त्यामुळे सर्वांनाच नोकऱ्या मिळणे शक्य नाही, हे ओघानेच आले. त्यात भर पडलेली आहे ती कॉम्प्युटरची. पूर्वीपेक्षा कमी वेळात व कमी माणसात कॉम्प्युटरच्या द्वारे उत्तम कार्य साधता येते. त्यामुळे सुद्धा बेकारीत वाढ झालेली आहे. म्हणून पदवीधर तरुणांनी नोकऱ्यांच्या पाठी न लागता स्वतंत्र व्यवसाय करण्याचा पर्याय शोधला पाहिजे. अडाणी, अशिक्षित माणसे सुद्धा स्वतंत्र उद्योग धंदे करून पैसा व संपत्ती मिळवितात, मग पदवीधर तरुणांना तसे करण्यास कांहीच अडचण असता कामा नये. दुसरा मुद्दा असा की, नोकऱ्यांच्या मागे धावणाऱ्या तरुणांना नोकऱ्या न मिळाल्यामुळे त्यांच्या ठिकाणी नैराश्य व वैफल्य येते. अशा परिस्थितीत ही पदवीधर तरुण मुले वाटेल ते करण्यास प्रवृत्त होतात. अशा परिस्थितीत नेमका फायदा समाजातील दुर्जन माणसे अचूक उठवितात. नोकऱ्या देण्याच्या निमित्ताने या तरुण मुलांना ती दुर्जन माणसे अनिष्ट गोष्टी करण्यास सांगतात आणि एकदा का त्यांच्या हातून गुन्हा घडला की मग त्या तरुण मुलांना दुर्जन माणसांच्या पाठीमागे फरफटत जाण्याशिवाय पर्याय उरत नाही. वाघाच्या गुहेत गेलेला माणूस परत येऊ शकत नाही, त्याप्रमाणे दुर्जन माणसांच्या आहारी गेलेल्या तरुण मुलांना परतीचा मार्ग बंद होतो. अशा परिस्थितीत कितीही पश्चाताप झाला तरी त्याचा कांहीच उपयोग होत नाही, कारण वेळ निघून गेलेली असते. तिसरा मुद्दा असा की, काळे धंदे करून काळा पैसा मिळविणारी अशिक्षित किंवा

सुशिक्षित माणसे गडगंज संपत्ती मिळवितात व चैन–चंगळ करतात, हे जरी खरे असले तरी हे लोक सुखी जीवनाला संपूर्ण पारखे झालेले असतात, ही गोष्ट विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. काळा धंदा करून काळा पैसा संपादन करणारी माणसे हे प्रत्यक्षात गुन्हेगार असतात. परंतु प्रत्यक्ष गुन्हा शाबीत होईपर्यंत ही माणसे उजळ माथ्याने समाजात वावरत असतात. अशा ह्या गुन्हेगार लोकांना सुख–शांती, समाधान केव्हांही मिळत नाही. उलट हे लोक भयंकर टेन्शनखाली जीवन जगत असतात. हे जगणे म्हणजे प्रत्यक्षात क्षणाक्षणाला मरणे असते. निसर्ग नियमाप्रमाणे काळे धंदे करणाऱ्या माणसांची दुष्कृत्ये आज ना उद्या बुमरँग होऊन त्यांच्यावर उलटतात. सर्व प्रकारचे शारिरीक व मानसिक रोग, संकटे, आपत्ती, विपत्ती, क्लेश, दु:ख, व्यसनांच्या आहारी गेलेली मुले, अशा अनिष्ट गोष्टींना ह्या लोकांना सामोरे जावे लागते. अनिष्ट व भ्रष्ट मार्गांनी मिळविलेला शापित पैसा तो मिळविणाऱ्यांना तापदायक तर ठरतोच, पण तो पैसा त्यांच्या मुलाबाळांना व पुढील पिढ्यांना वारसाहक्काने व निसर्ग नियमानुसार अत्यंत क्लेशकारक, दु:खकारक व हानिकारक ठरतो. हे सर्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी अशा दुर्जन माणसांच्या आहारी जाऊ नये, हेच त्यांच्या व राष्ट्राच्या हिताचे आहे. चौथा मुद्दा असा की, 'पैसा मिळविणे' या गोष्टीला विद्यार्थ्यांनी वाजवीपेक्षा फाजील महत्व देऊ नये. पैसा कोणीही मिळवू शकतो. चोर, दरोडेखोर, दहशतवादी, वेश्या, काळाबाजार करणारे लोक सुद्धा अनिष्ट गोष्टी करून पैसा मिळवितात व चैन चंगळ करतात, परंतु

ही माणसे वर म्हटल्याप्रमाणे कधीही सुखी होऊ शकत नाहीत. प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी खाली उतरला तरी तो सुद्धा या लोकांना सुखी करू शकणार नाही. दुसऱ्यांना फसवून, लुबाडून व दु:खाच्या खाईत लोटून पैसा मिळविणारा कोणीही माणूस कधीही सुखी होऊ शकत नाही. पैसा म्हणजे लक्ष्मी, असे सर्वसामान्यपणे समजले जाते. परंतु हे पूर्ण सत्य नाही. अनिष्ट मार्गाने मिळविलेला पैसा म्हणजे प्रत्यक्षात कडक लक्ष्मी असून चांगल्या मार्गाने मिळविलेला पैसा ही महालक्ष्मी होय. कडकलक्ष्मी जीवनात सर्व प्रकारच्या कटकटी, क्लेश व कलह निर्माण करण्यास कारणीभूत ठरते. तर त्याच्या उलट महालक्ष्मी माणसाच्या जीवनात सुख, शांती, यश व समृद्धी प्राप्त करून देते. ज्याप्रमाणे निसर्गनियमांना अनुसरून माणसाच्या पोटी माणूसच जन्माला येतो, वाघाच्या पोटी वाघच जन्माला येतो त्याचप्रमाणे दु:खातून दु:खच निर्माण होते व सुखातून सुखच निर्माण होते. म्हणून जे दुसऱ्यांना सुख किंवा दु:ख देतात ते सुख–दु:ख बुमरँग होऊन सहस्त्रपटीने परत येऊन त्यांना सुखी किंवा दु:खी करण्यास कारणीभूत ठरते. विद्यार्थ्यांनी हे लक्षात ठेवावे की, चैन चंगळ करणाऱ्या लोकांच्या वाट्याला सरते शेवटी दैन्य व ओंगळ जीवन हमखास येते. शिवाय जे लोक अनिष्ट मार्गानी काळा पैसा संपादन करतात ते लोक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला भयंकर धोका निर्माण करतात. असे हे लोक समाजद्रोही व राष्ट्रद्रोही असून राष्ट्राचे एक नंबरचे शत्रू होत.

प्र. ४४ कांही विद्यार्थी कॉपी करून पास होतात. या संदर्भात आपण

कांही मार्गदर्शन कराल का ?

उत्तर कॉपी करणे हाच मुळात गुन्हा आहे आणि गुन्हेगार म्हटला की एकतर त्याला कायद्याप्रमाणे शिक्षा होते किंवा निसर्गनियमाप्रमाणे शिक्षा होते. कायद्याच्या कचाट्यातून कांही कारणामुळे सुटला तर निसर्गनियमाप्रमाणे त्याला शिक्षा होतेच. दुसरा मुद्दा असा की, अभ्यास न करता कॉपी करून पास होण्यात तो विद्यार्थी स्वत:ला, त्याच्या पालकांना, शिक्षकांना व देवाला फसवित असतो. अभ्यास न करता कॉपी केल्यामुळे पास होणे शक्य आहे. परंतु ज्ञान मिळविणे शक्य नाही. विद्यार्थ्यांनी जर अभ्यास करून ज्ञान संपादन केले नाही तर भविष्यात तो कुठेही जरी गेला तरी तो विद्यार्थी कोणालाही उपयुक्त ठरणार नाही. अशा निरुपयोगी विद्यार्थ्यांच्या वाट्याला भविष्यात गंभीर व बिकट परिस्थिती आली नाही तरच नवल. तिसरा मुद्दा असा की, शाळेत किंवा कॉलेजात शिकत असताना अभ्यासाचा कंटाळा केला व त्याकडे दुर्लक्ष केले तर त्या वेळेपुरतेच अभ्यासाचे कष्ट वाचतील परंतु भविष्यात मात्र, शिक्षणाच्या द्वारे ज्ञान न संपादन केल्यामुळे त्या विद्यार्थ्याला अपरिमित कष्ट सोसावे लागतील. याचाच अर्थ असा की, जीवनात कष्ट चुकविता येत नाहीत. शाळेत किंवा कॉलेजात अभ्यासाचे कष्ट घेतले नाहीत तर भविष्यात वाटेल ती कष्टाची कामे करणे भाग पडेल. चौथा मुद्दा असा की, वस्तुस्थिती लक्षात घेतली तर अभ्यास करण्यात विशेष कष्ट नसतात. उलट मन स्थिर करून ज्ञान संपादन करण्याच्या हेतूने अभ्यास केला तर कष्ट वाटत नाहीतच, उलट अभ्यास करण्यात गोडी

वाटू लागते. थोडक्यात, कॉपी करून स्वत:ला व इतरांना फसविण्यापेक्षा अभ्यास करून यश संपादन करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे ठरेल.

प्र. ४५ विद्यार्थी एकमेकांचा द्वेष, मत्सर करतात त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रगती खुंटते का? अशा विद्यार्थ्यांना आपण कांही मार्गदर्शन कराल का?

उत्तर विद्यार्थी एकमेकांचा द्वेष व मत्सर करीत असतील तर त्याच्या इतका मूर्खपणा दुसरा कुठलाही असू शकत नाही. एकमेकांचा द्वेष, मत्सर केल्याने विषारी विचारांचे स्पंद (Vibrations) ते विद्यार्थी वातावरणात प्रक्षेपित करीत असतात. कोळसा जितका उगाळावा तितका तो अधिक काळा कुळकुळीत होतो. त्याप्रमाणे द्वेष व मत्सर केल्याने विद्यार्थ्यांचे परस्पर संबंध अधिकच चिघळत जातात. त्यामुळे फायदा तर कोणाचाच होत नाही, परंतु विद्यार्थ्यांचे नुकसान मात्र होण्याची दाट शक्यता असते. दुसरा मुद्दा असा जे विद्यार्थी द्वेष, मत्सर करतात ते विद्यार्थी स्वत:च्या शरीररुपी कॉम्प्युटरला अनिष्ट फिडींग करीत असतात व त्याचबरोबर इतरांच्या मानवी शरीररुपी कॉम्प्युटरना अनिष्ट फिडींग करतात. कॉम्प्युटरला तुम्ही जसे चुकीचे किंवा बरोबर फिडींग कराल, त्याप्रमाणे तुम्हाला चुकीचे किंवा बरोबर रिझल्टस् मिळतात, त्याचप्रमाणे मानवी शरीररुपी कॉम्प्युटरला द्वेष, मत्सर करण्याच्या द्वारे अनिष्ट फिडींग केल्याने त्या विद्यार्थ्यांना अनिष्ट फळे प्राप्त होतील, हे ओघानेच आले. या संदर्भात डॉ. मर्फी यांचे खालील विचार विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

"Thoughts of jealousy, fear, worry and anxiety tear down your nerves and glands bringing about physical and mental diseases of all kinds."

म्हणून एकमेकांचा द्वेष, मत्सर करून स्वत:चे व इतरांचे नुकसान करण्यापेक्षा परस्परांना सहकार्य व मदत करून सर्वांचेच कल्याण साधण्यात विद्यार्थ्यांचे हित आहे.

प्र. ४६ भ्रष्टाचार, अत्याचार व दुराचार अशा अनिष्ट गोष्टींनी वातावरण बिघडलेले आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी त्यांच्या डोळ्यासमोर कोणाचा आदर्श ठेवावा हेच त्यांना समजत नाही. या संदर्भात आपण कांही मार्गदर्शन कराल का ?

उत्तर गावात थंडी पडली तर आपण अंगात गरम कपडे घालून स्वत:चे थंडीपासून संरक्षण करतो. त्याचप्रमाणे जरी सर्वत्र भ्रष्टाचार, दुराचार व अनाचार चालत असले तरी आपण आपल्याला मिळालेल्या सुसंस्कारांच्या प्रभावाने त्यापासून स्वत:ला अलिप्त ठेवले पाहिजे. दुसरा मुद्दा असा की भ्रष्टाचार, दुराचार, अनाचार अशा अनिष्ट गोष्टी आजच्याच काळात घडत आहेत व पूर्वीच्या काळी घडत नव्हत्या असा प्रकार नाही. या अनिष्ट गोष्टी प्राचीन काळापासून चालत आलेल्या आहेत. या सर्व अनिष्ट गोष्टींना एकमेव कारण म्हणजे 'विचार प्रदूषण' हे होय. अखिल मानव जात अज्ञानाच्या चिखलात रुतलेली आहे. या अज्ञानातूनच, अहंकार, अंधश्रद्धा, अभिमान, अविचार, असुया आणि असमाधान या सर्व अनिष्ट गोष्टी निर्माण होतात. त्यातूनच विचार प्रदूषणाचा महाभयंकर राक्षस

निर्माण होतो व तोच राक्षस मानवी जीवनात भ्रष्टाचार, दुराचार, अनाचार, बलात्कार, तंटेबखेडे, दंगे–धोपे, युद्ध–लढाया वगैरे अनिष्ट गोष्टी निर्माण करतो. या विचार प्रदूषणाला आळा घालण्यासाठीच जीवनविद्येची निर्मिती झालेली आहे. आमच्या मते –

"Jeevanvidya is the only solution for this thought pollution."

विद्यार्थ्यांनी या जीवनविद्येचा लाभ घ्यावा व वरील अनिष्ट गोष्टींपासून स्वत:चे संरक्षण करावे. तिसरा मुद्दा असा आपल्या राष्ट्रात अनेक प्रतापी, पराक्रमी व महान पुरुष व स्त्रिया आतापर्यंत निर्माण झालेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा.

प्र. ४७ आपल्या मते विद्यार्थ्यांनी देवाची भक्ती उपासना करणे योग्य आहे का ? त्यासंबंधी आपण मार्गदर्शन करावे.

उत्तर पारंपारीक पद्धतीने जगातील सर्व लोक जी परमेश्वराची भक्ती, उपासना करतात ती उपासना पद्धती अपवाद वगळता कर्मकांडात्मक असते. जीवनविद्येला कर्मकांड मुळातच मान्य नाही आणि म्हणून कर्मकांडात्मक पद्धतीने केलेली उपासना सुद्धा मान्य नाही. जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून शाळा–कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांनी 'शिक्षण घेणे', हीच सर्वात श्रेष्ठ उपासना आहे. शाळा–कॉलेज हे मंदिर आहे, शिक्षक हा त्या मंदिरातील परमेश्वर आहे, विद्यार्थी हे उपासक आहेत व मन:पूर्वक ज्ञान संपादन करण्यासाठी अभ्यास करणे ही उपासना होय. अशा प्रकारे ज्ञान संपादन करण्यासाठी अभ्यास करणारे विद्यार्थी

'शिक्षक' या देवाला प्रसन्न करतात, त्यांच्या आई–वडिलांना संतुष्ट करतात व भविष्यात समाजाची व राष्ट्राची उत्कृष्ट सेवा करण्यासाठी स्वत:मध्ये पात्रता निर्माण करतात. "Knowledge is God" किंवा ''ज्ञान हाच देव'', हे विद्यार्थ्यांनी नित्य स्मरणात ठेवले पाहिजे. अशा प्रकारे ज्ञानोपासना करून ज्ञान संपादन करणारे विद्यार्थी भविष्यात राष्ट्राचे श्रेष्ठ नागरिक होऊन आपल्या राष्ट्राला इतर सर्व राष्ट्रांच्या पुढे अग्रेसर करण्यास समर्थ ठरतात. त्याचप्रमाणे शरिराला आरोग्य प्राप्त करून घेण्यासाठी, मनाला स्थिरता आणण्यासाठी, चित्ताला शांती मिळण्यासाठी व बुद्धीचा विकास घडवून आणण्यासाठी जे कांही केले जाते, त्याला सुद्धा जीवनविद्या उपासना असे म्हणते. उपासना या शब्दाचा अर्थ उप म्हणजे जवळ व आसन म्हणजे बैठक असा आहे. परमेश्वराच्या अगदी जवळ आपली बैठक असणे म्हणजे उपासना होय. स्वानंद आपले स्वरूप आहे. आनंद–गोविंद ही नांवे त्या परमेश्वराचीच आहेत म्हणून आपण आपले जीवन आनंदमय करणे व इतरांना जीवन आनंदमय करण्यासाठी यथाशक्ती सहाय्यभूत होणे, हीच खरी उपासना होय. जेव्हां व्यायामाच्या किंवा योगासनाच्या द्वारे शरिराला आरोग्य प्राप्त होते, तेव्हां आपल्याला आनंद प्राप्त होतो. आरोग्यासारखा दुसरा आनंद नाही. शुभ चिंतन व ईश्वर स्मरण केल्याने मनाला स्थिरता प्राप्त होते. शुभ बोलण्याने व शुभ आचार केल्याने चित्ताला शांती मिळते व योग्य पद्धतीने अभ्यास केल्याने बुद्धीचा विकास होतो. थोडक्यात, अभ्यास करणे हा सुद्धा उपासनेचाच एक अविभाज्य

भाग आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी जीवनविद्येने सांगितलेली उपासना करावी व स्वत:चे, समाजाचे व राष्ट्राचे कल्याण साधावे.

प्र. ४८ विद्यार्थ्यांची शिक्षकांकडे व शिक्षकांची विद्यार्थ्यांकडे पहाण्याची दृष्टी कशी असावी ? या संबंधी आपण कांही मार्गदर्शन करावे.

उत्तर 'क्रिया तशी प्रतिक्रिया' (Law of action and reaction) हा निसर्गाचा अटळ नियम आहे. हा निसर्गाचा अटळ नियम लक्षात घेऊन जीवन जगता आले पाहिजे. ज्या दृष्टीने शिक्षक विद्यार्थ्यांकडे व विद्यार्थी शिक्षकांकडे पहातील व वागतील त्याप्रमाणे त्यांना परस्परांकडून तशाच स्वरुपाचा प्रतिसाद मिळत राहिल. आपल्यासमोर बसलेले विद्यार्थी हे उद्याचे राष्ट्राचे नागरिक आहेत. राष्ट्राचे भले होणे किंवा वाटोळे होणे, म्हणजेच पर्यायाने आपले सर्वांचेच भले होणे किंवा वाटोळे होणे, हे सर्वस्वी या उद्याच्या नागरिकांवर अवलंबून राहणार आहे, हे सत्य लक्षात घेऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे पहावे व त्यांना अत्यंत मनापासून योग्य शिक्षण देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे शिक्षकांकडून आपल्याला जे ज्ञान व शिक्षण मिळणार आहे ते भवितव्यात आपल्याला जीवन यशस्वी करण्यासाठी सर्वार्थाने उपयुक्त ठरणार आहे, हे सत्य लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा मान ठेवावा, त्यांचा सन्मान करावा व त्यांचा आदर करावा.

प्र. ४९ पाप–पुण्याच्या कल्पना संबंधी विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ असलेला दिसून येतो. या संदर्भात आपण मार्गदर्शन करावे.

उत्तर पाप–पुण्याच्या कल्पना म्हणजे केवळ अंधश्रद्धा होय, अशी

कांही लोकांची विचारधारणा असते. परंतु ही विचारधारणा पूर्ण चुकीची असून तिला अज्ञानाचे अधिष्ठान असते. पाप–पुण्या संबंधी लोकमानसात चुकीच्या समजूती आहेत हे मात्र पूर्णतः खरेच आहे. त्याचप्रमाणे पापालाच पुण्य व पुण्यालाच पाप समजणारे लोक मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून पाप–पुण्याच्या संकल्पना आगळ्या आणि वेगळ्या आहेत. माणूस हा समाजात राहणारा प्राणी आहे व त्याच्यावर समाजाचे विविध प्रकारे उपकार होत असतात. समाजाचे ऋण फेडणे हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य असते. आपण जे इष्ट किंवा अनिष्ट विचार–उच्चार–आचार करतो त्याचे बरे–वाईट परिणाम समाजावर होतात व समाजामध्ये ज्या घटना घडतात त्याचे बरे–वाईट परिणाम आपल्यावर होत असतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन आपण जे कर्म करू ते आपल्या व समाजाच्या भल्यासाठीच असले पाहिजे. अशा कर्मांनाच पुण्य असे जीवनविद्या संबोधिते, त्याच्या उलट आपल्याकडून घडणाऱ्या कर्माने आपले व समाजाचे नुकसान होत असेल तर ते कर्म म्हणजे पाप होय. थोडक्यात, दुष्कर्मांतून व सत्कर्मांतून पाप पुण्य निर्माण होते, हेच पाप–पुण्य परिपक्व झाले की त्याला अशुभ किंवा शुभ नियती म्हणतात व हीच नियती फळाला येऊन आपल्या सुख–दुःखाला कारणीभूत ठरते.

प्र. ५० जीवनविद्येच्या दृष्टिकोनातून राष्ट्राचा उत्तम नागरिक कोण संबोधिला जातो ? या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ?

उत्तर १) राष्ट्र हे आपल्या जीवनाचे सर्वस्व असून राष्ट्रासाठी

कुठलाही त्याग करण्यास जो सिद्ध असतो तो या राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

२) राष्ट्राची अधोगती होण्यात आपली अधोगती आहे व राष्ट्राची प्रगती होण्यात आपली प्रगती आहे हे जो जाणतो तो या राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

३) ''राष्ट्रशिस्त, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रगती, राष्ट्र संरक्षण आणि राष्ट्र कर्तव्य'' हे राष्ट्रीय जीवनाचे पंचशील जो पालन करतो तो राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

४) राष्ट्राला प्रगती पथावर नेण्यासाठी जो विविध क्षेत्रात प्रवेश करून ज्ञान संपादन करतो व त्या ज्ञानाचा उपयोग राष्ट्राच्या उत्कर्षासाठी करतो तो राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

५) आपल्या वाट्याला आलेले समाज उपयुक्त काम जो अत्यंत आवडीने, प्रामाणिकपणे व मनोभावे करतो तो राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

६) भ्रष्टाचार, दुराचार, अत्याचार वगैरे अनिष्ट मार्गांनी जो सत्ता–संपत्ती–पैसा संपादन करीत नाही तो राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

७) हातात आलेली सत्ता जो स्वत:च्या स्वार्थासाठी न राबविता फक्त लोकांच्या भल्यासाठी, हितासाठी, कल्याणासाठी व राष्ट्र प्रगतीसाठी वापरतो तो या राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

८) धर्म, वर्ण, जात, जमात, पंथ, वंश, प्रांत अशा मानवानेच निर्माण केलेल्या मानव निर्मित संकुचित बंधनांना जो

महत्व देत नाही व ''आपण सर्व राष्ट्राचे नागरिक असून आपण सर्व समान आहोत'' अशी ज्याची प्रामाणिक धारणा असते, तो राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

९) आपला प्रत्येक 'विचार–उच्चार–आचार' हा राष्ट्राच्या भल्यासाठी, कल्याणासाठी, हितासाठीच असला पाहिजे, या धारणेने जो जीवन जगतो, तो राष्ट्राचा उत्तम नागरिक होय.

या देशातील प्रत्येक विद्यार्थी राष्ट्राचा उत्तम नागरिक बनावा हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

✿ ✿ ✿

सद्‌गुरू श्री. वामनराव पै

## यांचा दिव्य संदेश

### ''तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार''

## दिव्य संकेत

**''परमेश्वर एक आहे, मानवजात एक आहे, मानवी मन एक आहे, मानवधर्म एक आहे, मानवी संस्कृती एक आहे'' ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन विश्वमानवाच्या विश्वशांतीचे एकच ध्येय डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी प्रयत्न करण्यातच मानवजातीचे कल्याण आहे.**

## कामावरती प्रेम करा

काम करा हो काम करा
कामावरती प्रेम करा
काम करा आणि पोट भरा
निसर्ग नियम हाची खरा ।। १ ।।

जीवन विद्येचा बोध स्मरा
उद्योगची हा योग खरा
राष्ट्राला समृद्ध करा
राष्ट्रामध्ये देव पहा ।। २ ।।

इतरांचे भले चिंतावे
त्यांच्या सुखाने सुखी व्हावे
हाताने काम, मुखाने नाम
हृदयामध्ये आत्माराम ।। ३ ।।

• • • • • • • • • • • • • • • • • • •

## असा हा विश्वधर्म

तुम्ही सुखाने जगा । इतरांना सुखाने जगू द्या ।
खरा धर्म हो म्हणताती । या धारणेला।। धृ. ।।
अखिल मानवजातीसाठी। धर्म एकच आहे ।
जीवन धर्म म्हणती त्याला । म्हणताती त्याला या धारणेला ।। १ ।।
माणूसकीला जो जागला। त्याने देव पूजिला।
मानवधर्म म्हणती त्याला । म्हणताती त्याला या धारणेला ।। २ ।।